जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## कालातीत प्रथम लेखक- महर्षी वेद व्यास

वाचनीय मननीय - प्रेरणादायी - अक्षर धन - संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

सर्वसामान्य व्यक्तीला, त्याच्या परमकल्याणाच्या मार्गावर घेऊन जाणाऱ्या ३ परंपरा आपल्या देशात अस्तित्वात आहेत. एक ऋषी, दुसरी आचार्य आणि तिसरी संत-परंपरा.


ऋषी शास्त्रांची निर्मिती करतात. आचार्य शास्त्रांचा प्रसार करतात आणि संत-शास्त्रं सामान्यांपर्यंत नेऊन पोहोचवतात. ऋषींचं साधन प्रज्ञा, आचार्यांचं प्रयोजन आणि संतांचं प्रेम. ऋषी निःसंग असतात, त्यांना एकांत आवडतो. आचार्यांपर्यंत शिष्य पोहोचतात अन् संत स्वतः जनसामान्यांपर्यंत पोहोचतात.

या तीनही परंपरांचं वहन एकत्रितपणे करणारी एकमेव व्यक्ती म्हणजे महर्षी वेदव्यास. वेदांच्या संकलनात आणि ब्रह्मसूत्रांच्या रचनेत त्यांनी ऋषींचं कार्य केलं.


वेदविभाजनात आचार्यांचं कर्तव्य केलं आणि पुराण प्रवक्त्याच्या रूपात संतांचं कार्य केलं. व्यास केवळ महर्षीच नव्हे तर आचार्य व संतही होते. ते त्यांच्या ठायी प्रेम होतं म्हणून ४०० वर्षांच्या आयुष्यात त्यांनी कठोर वाणी वा शाप दिला नाही.

सामान्यतः तात्कालिक समाजाला संतवचने गांभीर्याने घ्यायची गरज वाटत नाही. व्यास म्हणायचे, ''दोन्ही हात उंचावून मी वारंवार साऱ्या विश्वाला सांगत आलो आहे की, अर्थ व काम यापेक्षा धर्म महत्त्वाचा आहे. पण माझ्या सांगण्याकडे कोणीही अवधान देत नाही.''

आता अवधानच द्यायचं नाही म्हटल्यावर आचरणाची तर संभावनाही दृष्टीपथात नसणार, नाही का? (डॉ. भारती सुदामे)



## जगप्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन



नवी दिल्ली - तबलावादक आणि पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन झाले. सोमवारी सकाळी त्यांच्या कुटुंबीयांनी याला दुजोरा दिला. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार हुसेन हे इडिओपॅथिक पल्मोनरी फायब्रोसिसने ग्रस्त होते. गेल्या दोन आठवड्यांपासून ते सॅन फ्रान्सिस्को येथील रुग्णालयात दाखल होते.

झाकीर यांचा जन्म ९ मार्च १९५१ रोजी मुंबईत झाला. उस्ताद झाकीर हुसेन यांना १९८८ मध्ये पद्मश्री, २००२ मध्ये पद्मभूषण आणि २०२३ मध्ये पद्मविभूषणने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या वडिलांचे नाव उस्ताद अल्लारखा कुरेशी आणि आईचे नाव बावी बेगम होते. झाकीर यांचे वडील अल्लारखा हेही तबलावादक होते. झाकीर हुसेन यांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील माहीम येथील सेंट मायकल स्कूलमधून झाले. मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून त्यांनी ग्रॅज्युएशन केले. हुसेन यांनी वयाच्या अवघ्या ११ व्या वर्षी अमेरिकेत पहिला कॉन्सर्ट केला होता. १९७३ मध्ये त्यांनी त्यांचा पहिला अल्बम 'लिव्हिंग इन द मटेरियल वर्ल्ड' लाँच केला. हुसेन यांना २००९ मध्ये पहिला ग्रॅमी पुरस्कार मिळाला होता. २०२४ मध्ये त्यांनी ३ वेगवेगळ्या अल्बमसाठी ३ ग्रॅमी जिंकले.

## बाळासाहेब गायके यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - रेल्वे स्टेशन,गायके मळा येथील रहिवासी बाळासाहेब देवराम गायके (वय ६५) यांचे १४ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नगर येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात धाकटे बंधू विजय (नाना) गायके, पत्नी, मुलगा, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. माजी महापौर अभिषेक कळमकर व केडगावचे माजी नगरसेवक सुनील कोतकर यांचे ते सासरे होते. बाळासाहेब गायके हे मनमिळाऊ स्वभावाचे होते. रेल्वे स्टेशन व आगरकर मळा येथे त्यांचा मोठा मित्रपरिवार होता.

## बाळासाहेब फुलसौंदर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - भोसले आखाडा येथील फुलसौंदर चाळीतील रहिवासी बाळासाहेब लक्ष्मणराव फुलसौंदर (वय ६५) यांचे १५ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, जावई असा परिवार आहे. संदीप, प्रदीप फुलसौंदर यांचे ते वडील होत.

## अमृत देवकर यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - नालेगावातील रोहोकले गल्ली येथील रहिवासी अमृत (भैय्या) लक्ष्मण देवकर (वय ३३) यांचे १५ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे आई, वडील, १ बहिण, १ भाऊ, भावजय, पत्नी असा परिवार आहे. लक्ष्मण देवकर यांचे ते चिरंजीव होत.

## रवि पातारे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - केडगाव येथील रहिवासी रवि कांताकेशव पातारे गोरेगावकर (वय ५०) यांचे १५ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, २ भाऊ, भावजय, पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे.

## प्रशांत सोनवणे (मेजर) यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील भारतीय सेनादलातील सेवानिवृत्त सैनिक प्रशांत आनंदराव सोनवणे (मेजर) वय ५० यांचे १५ डिसेंबर रोजी सायं. ६ वा. अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे असा परिवार आहे. संदिप सोनवणे यांचे थोरले बंधू, चि.हर्षल सोनवणे यांचे वडील, प्रणव, प्रज्वल व आर्यन सोनवणे यांचे चुलते होत.

## आण्णासाहेब (दादा) पाटील थोरात यांचे निधन



श्रीरामपूर - येथील महाराष्ट्र राज्य खंडकरी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष व कम्युनिस्ट पक्षाचे कॉ.आण्णासाहेब (दादा) लक्ष्मण पाटील थोरात (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. उक्कलगाव व माळवाडगाव येथील शेतकरी साहेबराव व बाळासाहेब थोरात यांचे थोरले बंधू कचरू व पोपट थोरात यांचे वडील, प्रकाश, विलास, किरण व योगेश थोरात यांचे चुलते, चि.ऋषिकेश व हर्षद थोरात यांचे आजोबा होत.

## आनंद छतलानी यांचे अल्प आजाराने निधन



छत्रपती संभाजीनगर - कुंवारफल्ली, राजाबाजार येथील रहिवासी आनंद जीवन छतलानी (वय ३३) यांचे अल्पशा आजाराने १३ डिसेंबर रोजी राहत्या घरी निधन झाले. त्यांच्यावर कैलासनगर स्मशानभूमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहिण असा परिवार आहे.

# रामवाडी परिसरात सहा ते सात जणांच्या टोळीकडून दांडके, तलवारीने मारहाण, दगडफेक करून तोडफोड

नगर - जुन्या भांडणाच्या कारणावरून ६ ते ७ जणांच्या टोळीने रामवाडी परिसरात एसटी डेपो रविवारी (दि.१५) रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास तुफान धिंगाणा घातला. तिघांना लाकडी दांडके, तलवारीने मारहाण करत रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांवर दगडफेक करत वाहनांची तोडफोड केली. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी सुरज जाधव सह त्याच्या साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत मारहाणीत जखमी झालेल्या अश्विन संजय खुडे,(वय ३०, रा.एसटी डेपो समोर, रामवाडी अ.नगर) याने तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी खुडे हा त्याच्या मित्रांसह रामवाडी येथील रोडवर असताना जुन्या भांडणाच्या कारणावरुन सुरज जाधव याने त्याला फोन केला व म्हणाला तु जास्त माजला काय तुझे हातपाय तोडून टाकीन. त्यावर अश्विन त्याला म्हणाला काय झाले आहे तु मला का शिव्या देतो, असे म्हणल्याचा त्याला राग आल्याने तो म्हणाला तु कुठे आहे तेथेच थांब असे म्हणुन सुरज जाधव हा अजय सासवडकर, शुभम गंगेकर, जय लोटके समर्थ ढेरेकर (सर्व रा. तोफखाना अ.नगर) व त्यांचे सोबत इतर अनोळखी इसमांसह रामवाडी येथे आला.

आल्याबरोबर त्याने अश्विन यास लाथा बुक्क्यांनी मारण्यास सुरुवात केली. त्यावेळी सुरज जाधव याने त्याचे हातातील लाकडी दांडक्याने त्याच्या उजव्या हातावर मारुन जखमी केले. मारहाण करत असताना अश्विनचे मित्र सुधीर राजु मिसाळ, व अजय विजय भोसले (रा. रामवाडी) हे भांडण सोडविण्यासाठी मध्ये आले असता अजय सासवडकर याने त्याचे हातातील तलवार सुधीर मिसाळ याचे डोक्यात मारुन त्याला जखमी केले व शुभम गंगेकर याने अजय भोसले याच्या पाठीत तलवार मारुन त्याचे पायावर लाकडी दांडक्याने मारहाण केली.

त्यावेळी ते तिघे ही जीव वाचविण्यासाठी तेथुन पळुन जात असताना आरोपींनी दगडफेक करून एसटी डेपोसमोर लावलेली बुलेट मोटारसायकल (क्र.एम एच १४ ए टी ६६९९) व (क्र.एम एच १६ सी जे ०००५) तसेच रिक्षा (क्र. एम एच १६ सी ई १८८८), ऍक्सेस मोपेड गाडी (क्र. एम एच १६ ए जी १४४४) असे गाड्यांचे फोडुन नुकसान केले व म्हणाले तुला कोणाला आणायचे त्याला आण, तु जर आंम्हाला परत भेटला तर तुला आंम्ही जिवंत सोडणार नाही अशी जीवे मारण्याची धमकी देवुन मोठमोठ्याने शिव्या देत तेथुन निघुन गेले.

या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी अश्विन खुडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुरज जाधव,अजय सासवडकर, शुभम गंगेकर, जय लोटके, समर्थ ढेरेकर व त्यांचे सोबत असणाऱ्या इतर अनोळखी इसमाविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## सुरज जाधव व टोळीविरुद्ध हद्दपारीची कारवाई करा

नगर - सुरज जाधव हा सराईत गुन्हेगार असून त्याची गुंडांची टोळी आहे. या टोळी मार्फत त्याचे शहरात अनेक अवैध धंदे सुरु असून त्याच्यावर या पूर्वी अनेक हाणामारीचे, गुंडागर्दीचे, धमकावल्याचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्या टोळी पासून शहरातील शांतता, कायदा व सुव्यवस्थेला बाधा असल्याने त्याच्यावर हद्दपारीची कारवाई करावी अशी मागणी माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी सांगितले की, सुरज जाधव याच्याविरुद्ध पोलिसांनी २ वर्षापूर्वी एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध्तेच्या कारवाईचा प्रस्ताव तयार केला होता. मात्र त्याला आणि त्याच्या टोळीला लोकप्रतिनिधी पाठीशी घालत आहेत. त्यामुळेच ती कारवाई झाली नाही, तसेच हद्दपारीची कारवाईही झालेली नाही.

याबाबत आपण विधानसभा निवडणुकीपूर्वीच जिल्हा पोलिस अधिक्षक राकेश ओला यांची भेट घेवून सविस्तर निवेदन दिले होते. मात्र पोलिसांनी काहीच कारवाई न केल्याने त्याने रविवारी रामवाडी परिसरात पुन्हा दहशत निर्माण केली असल्याचे झिंजे यांनी म्हंटले आहे.

# नगरमध्ये सराईत गुन्हेगाराकडून अभियंत्यावर चाकूने हल्ला

### बालिकाश्रम रोडवरील घटना सीसीटीव्हीत कैद, गुन्हा दाखल

नगर - बालिकाश्रम रोडवरील बडोदा बँक कॉलनी येथील रहिवासी अभियंता वैष्णवकुमार गंगाधर परदेशी (वय २८)याच्यावर विजय राजेंद्र पठारे (रा. सिद्धार्थनगर) याने चाकूने डोक्यावर सपा-सप वार करून प्राणघातक हल्ला केल्याची घटना रविवारी (दि.१५) रात्री सव्वा आठच्या सुमारास घडली आहे.

जखमी वैष्णवकुमार परदेशी हा रविवारी रात्री स्वतःच्या किरण दुकानात बसला असता अचानक गुंड विजय पठारे याने दुकानात घुसून डोक्यावर सपा-सप वार करून प्राणघातक हल्ला करून शिवीगाळ केली. तू बाहेर ये तुला संपूनच टाकतो अशी जीवे मारण्याची धमकीही पठारे याने परदेशीला दिली आहे. या प्राणघातक हल्ल्यात वैष्णवकुमार परदेशी हा गंभीर जखमी झाला असून त्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. भर वस्तीत वाहत्या रस्त्यावर घडलेल्या या प्राणघातक हल्लाची घटना दुकातील सीसीटीव्हीत कैद झाली आहे.



अभियंता वैष्णवकुमार परदेशी याच्यावर विजय पठारेने चाकूने हल्ला केल्याची घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून दुसऱ्या छायाचित्रात जिल्हा रुग्णालयात उपचार घेताना अभियंता परदेशी.

याबाबत रात्री उशिरा वैष्णवकुमार परदेशी याच्या तक्रारीवरून तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये विजय पठारे यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी देण्यात आलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, रविवारी रात्री ८:१५ वाजेच्या सुमारास मी कामावरून आल्यावर माझ्या किराणा दुकानाचे कॉऊंटर वर बसुन मोबाईल पाहत बसलेलो असताना विजु पठारे याने विनाकारण दुकानासमोर येवुन अचानक माझ्या डोक्यात चाकुने वार केला. त्यावेळी मी माझा भाऊ श्रीनिवास याला आवाज देवुन बोलावले असता विजु पठारे मला म्हणाला तु बाहेर ये आज तुला सपंवुनच टाकतो अशी धमकी देवून मला घाणघाण शिवीगाळ केली. त्यावेळी माझा भाऊ घरातुन बाहेर आला तेंव्हा विजु पठारे याचे घरातील लोक येवुन त्याला त्याचे घरी घेऊन गेले.

हल्लेखोर विजय पठारे हा गुंड प्रवृत्तीचा असून त्यांच्यापासून आमच्या कुटुंबियांच्या जीवाला धोका आहे. त्यामुळे पोलिसांनी गुंड वजय पठारे यावर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी हल्यातील जखमी वैष्णवकुमार याचा भाऊ श्रीनिवासकुमार परदेशी याने तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षकांकडे केली आहे.

## बुरूडगाव येथील तरुणाची झाडाला गळफास घेत आत्महत्या

नगर - बुरूडगाव (ता. नगर) येथील सीनानदीच्या कडेला असलेल्या झाडाला दोरीने गळफास घेत तरुणाने आत्महत्या केल्याची घटना रविवारी (दि.१५) सायंकाळी घडली. अरुण रघुनाथ पवार (वय २४, रा. बुरूडगाव, ता.नगर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

अरुण पवार याने रविवारी सायंकाळी झाडाला गळफास घेतला. ही बाब त्याच्या कुटुंबियांच्या निदर्शनास येताच त्यांनी रुग्णवाहिका बोलावून सायंकाळी ७.२० च्या सुमारास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.बटूळे यांनी त्यास मृत घोषित केले.

याबाबतची खबर नगर तालुका पोलिसांना देण्यात आल्यावर पोलिसांनी या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## बेशुद्धावस्थेत आढळलेल्या अनोळखी इसमाचा मृत्यू

नगर - नगर पुणे रोडवरील स्वस्तिक चौकाजवळील पुणे बसस्थानक येथे बेशुद्धावस्थेत आढळून आलेल्या ३५ वर्षीय अनोळखी इसमास औषधोपचार करीता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

याबाबत सिव्हिल हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ.खेडकर यांनी दिलेल्या माहितीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद केली. पुढील तपास पोलीस हवालदार भरत गाडीलकर हे करीत आहे. कोतवाली पोलीस त्याची ओळख पटविण्याचा प्रयत्न व नातेवाईकांचा शोध घेत आहे.

# ग्रॅच्युईटी, मृत्यू उपदानाची मर्यादा वीस लाख रुपयांपर्यंत वाढवली

नगर - केंद्र शासनाप्रमाणेराज्यातील निवृत्ती वेतनधारक, कुटुंब निवृत्ती धारकांना सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा १४ लाखांवरून वाढवून २० लाख रुपये करण्यात आली आहे. वित्त विभागाने गुरुवारी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला असून या निर्णयामुळे हजारो निवृत्त कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळणार आहे. शिक्षक भारती संघटनेने या मागणीसाठी अनेक पयत्न केले होते, आज त्या प्रयत्नांना यश मिळाले असल्याचे शिक्षक भारती संघटनेचे राज्य सचिव सुनिल गाडगे यांनी सांगितले.

सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा वाढविण्याची मागणी शिक्षक भारती संघटना आणि विविध शिक्षक कर्मचारी संघटनांकडून करण्यात आली होती. यासंदर्भात ४ सप्टेंबरला बैठक पार पडली. या बैठकीत संघटनांच्या मागणीवर सहमती दर्शवून राज्य सरकारने ३० सप्टेंबर रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब केले. या निर्णयाची अंमलबजावणी १ सप्टेंबर २०२४ पासून होणार आहे.

ग्रॅच्युईटी, मृत्यू उपदानाची मर्यादा २० लाखांपर्यंत वाढवल्याने सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा सौ. आशा मगर, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, कैलास जाधव, जिल्हासचिव विजय कराळे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिकचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, जिल्हा सचिव महेश पाडेकर, कार्याध्यक्ष किशोर डोंगरे, संभाजी पवार, कार्यवाह संजय भुसारी, हनुमंत रायकर, नवनाथ घोरपडे, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवणे, सोमनाथ बोंतले, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी या निर्णयाचे स्वागत करुन जल्लोष व्यक्त केला.



माळीवाडा परिसरातील रस्त्यालगतची हातगाड्या, टपऱ्या, फळविक्रेते यांची अतिक्रमणे हटविताना महापालिकेचे अतिक्रमणविरोधी पथक. (छाया - बबलू शेख)

# दुचाकीला वाचविण्याच्या प्रयत्नात कार दुसऱ्या वाहनाला धडकली; कारमधील महिलेचा मृत्यू

## जेऊर टोलनाक्याजवळील घटना

नगर - आडव्या आलेल्या दुचाकीला वाचविण्याच्या प्रयत्नात कार रस्तादुभाजक ओलांडून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला जावून दुसऱ्या वाहनाला धडकल्याने झालेल्या अपघातात कार मधील महिलेचा मृत्यू झाला तर कारचालक किरकोळ जखमी झाला आहे. नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर जेऊर टोलनाक्याजवळील स्वागत हॉटेल समोर रविवारी (दि.१५) सकाळी ८.३० च्या सुमारास हा अपघात झाला.

या अपघातात पुष्पा पोपटराव गवारे (वय ५५, रा.जेऊर, ता.नगर) यांचा मृत्यू झाला आहे, तर त्यांचा मुलगा आणि प्रताप उद्योग समूहाचे संचालक प्रताप पोपटराव गवारे हे जखमी झाले आहेत. मयत पुष्पा गवारे व त्यांचा मुलगा प्रताप हे त्यांच्या स्विफ्ट डिझायर कारने जेऊर कडून नगरच्या दिशेला येत होते. टोलनाक्याजवळील स्वागत हॉटेल समोर आडव्या आलेल्या दुचाकीला वाचविण्याचा प्रयत्न कार चालक प्रताप यांनी केला. मात्र त्यांची कार रस्ता दुभाजक ओलांडून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला गेली. त्याच वेळी त्या बाजूने येत असलेल्या वाहनाची त्यांच्या कारला धडक बसली. या अपघातात पुष्पा या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने उपचारासाठी नगरच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरु असताना सकाळी ११ च्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. याबाबतची माहिती एमआयडीसी पोलिसांना देण्यात आली. त्यांनी या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.



मयत पुष्पा गवारे

मयत पुष्पा गवारे यांच्यावर दुपारी जेऊर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

मयत पुष्पा जिल्हा बँकेचे अध्यक्ष आ. शिवाजीराव कर्डिले यांच्या पुतणी, संदीप कर्डिले यांच्या भगिनी तर जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती बाजीराव गवारे यांच्या भावजयी होत.

सेल्फ ॲडेसिव्ह पी व्हि सी वॉल टाईल्स, सेल्फ ॲडेसिव्ह वॉलपेपर, किचन वॉलपेपर, रोमन ब्लॉईंडस्,रोलर ब्लॉईंडस्, झेब्रा कस्टमाईज ब्लॉईंडस्, व्हर्टिकल ब्लॉईंडस्, कस्टमाईज ब्लॉईंडस्, तयार कर्टन्स, कर्टन क्लॉथ,कर्टन रॉड व फिटींग, मच्छर जाळी, आर्टि.वॉल ग्रास, धुळी पासुन संरक्षणसाठी प्लास्टीक तयार पडदे

गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

### दृष्टी सुधारण्यासाठी

लिंबाचा रस डोळ्यांसाठी खूप फायदेशीर आहे. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे डोळ्यांची रचना मजबूत राहते. दररोज लिंबाचा रस प्यायल्याने दृष्टी सुधारते आणि डोळ्यांच्या समस्या दूर होण्यास मदत होते.

## पाककला

### सुंठवडा

**साहित्य :** २०० ग्रॅम खोबरे, १०० ग्रॅम खारीक, १०० ग्रॅम खडीसाखर, बादाम, काजू, पिस्ता, मनुके एक टिस्पून, एक टिस्पून सुंठ पावडर, एक टिस्पून बडीशेप

**कृती :** सर्वात आधी खोबरे किसून हलकेसे भाजून घ्यावे. नंतर खारीक मधील बिया काढून खारीक, बडीशोप आणि काजू, बदाम हे वेगवगेळे भाजून घ्यावे. तसेच खारीक, खडीसाखर, बडीशोप मिक्सरमधून जाडसर दळावी. आता बदाम, काजू, पिस्ता एकत्रित करून मिक्सरमधून जाडसर रित्या दळून घ्यावे. सर्व साहित्य ताटात काढून व सुठ पावडर आणि मनुके घालून चांगल्या प्रकारे मिक्स करावे.

## वास्तू

### प्रगती होण्यासाठी

वास्तुशास्त्रानुसार देवगुरु गुरुला हळद अतिशय प्रिय आहे. त्यामुळे पाण्यात टाकून आंघोळ केल्याने कुंडलीत गुरु ग्रहाची स्थिती मजबूत होते. यासोबतच भगवान विष्णूचा विशेष आशीर्वाद प्राप्त होतो, ज्यामुळे घरात सुख-शांती राहते. याशिवाय जीवनात प्रगती होण्याची शक्यताही हळूहळू वाढते.

## सल्ला

वास्तुशास्त्रानुसार चुकूनही औषधे खिशात ठेवू नयेत, अन्यथा आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ लागतात.

## सौंदर्य

मिठाच्या पाण्याने अंघोळ केल्याने त्वचेची खाज आणि सूज कमी होते. हे ॲलर्जी आणि त्वचेच्या जळजळीपासून आराम देण्यास देखील मदत करते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १७ डिसेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, पुनर्वसू २४।४४, सूर्योदय ०६ वा. ३५ मि. सूर्यास्त ०६ वा. १५ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** शत्रूंपासून सावध राहा. स्त्री पक्षाचा आधार मिळेल. कामात सावधगिरी बाळगा. आर्थिक प्रकरणांमध्ये काळजीपूर्वक कार्ये करा.

**वृषभ :** महत्वपूर्ण कामे यशस्वीरित्या पूर्ण होतील. आरोग्य उत्तम राहील. पत्र मिळेल. आपल्या आरोग्याची काळजी घ्या. मानसन्म ानाच्या क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन :** नोकरदार व्यक्तींसाठी स्थिती अनुकूल राहील. राजकीय कार्ये पूर्ण होतील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. आरोग्य उत्तम राहील.

**कर्क :** कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. नवीन करार होतील. आरोग्य उत्तम राहील.

**सिंह :** कार्यक्षेत्रात मानसिक ताण होण्याची शक्यता आहे. आनंदाचे वातावरण असल्यामुळे कार्य सुरळीत होतील. कलाक्षेत्रात चमकदार कामगिरी कराल.

**कन्या :** महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. मनातल्या इच्छा पूर्ण होतील. उत्साहजनक बातम्या मिळतील. मनोरंजनावर खर्च होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**तूळ :** कौटुंबिक वातावरण आनंद आणेल. आर्थिक विषयांमध्ये आपल्या प्रयत्नांमुळे आपणास यश मिळेल. संततीसौख्य लाभेल.

**वृश्चिक :** कौशल्याच्या क्षेत्रात यश मिळेल. नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मित्रांचा लाभ मिळेल. मानसन्मान होईल. वैवाहिक सौख्य लाभेल.

**धनु :** आपण नव्या नोकरीसाठी संधी शोधू शकता किंवा नवी नोकरी सुरु करण्यासाठी संमतीच्या योजना बनवू शकता.

**मकर :** करियरबद्दल आपण हट्ट धरू शकता. कठोर परिश्रम केल्यानंतर यश मिळेल. व्यापार-व्यवसायात सावधगिरी बाळगा.

**कुंभ :** महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला नाही. उत्साहवर्धक बातमी मिळाल्याने आनंद होईल. आपल्यासाठी अनुकूल वेळ आहे

**मीन :** आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. जुने मित्र भेटतील. प्रापंचित व्यक्ती अस्वस्थ असतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**शिक्षक –** बंडू पेपर लिहायचा सोडून कशाचा विचार करतोस.
**बंडू –** कुठल्या प्रश्नाचे उतर कुठल्या खिशात आहे, याचा विचार करतोय सर.

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* किरबाती बेटे केव्हा स्वतंत्र घोषित करण्यात आली? – १२ जुलै १९७९
* पापूआ न्यू गिनी देशात किती भाषा बोलल्या जातात? – ८५०
* अमेरिकेपासून मार्शल बेट कधी स्वतंत्र करण्यात आली? – २ ऑक्टोबर १९८६
* पिटकॉर्न बेटांचा शोध कोणी लावला? – १७९०

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०७२ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | | ६ |
| | ■ | ७ | | | | ■ | |
| | ■ | ८ | | ■ | ८ | | |
| ९ | १० | ■ | ११ | १२ | | ■ | ■ |
| १३ | | १४ | ■ | | ■ | १५ | ■ |
| ■ | १६ | | १७ | ■ | १८ | | १९ |
| २० | | ■ | २१ | | | | |
| २२ | | | | ■ | २३ | | ■ |

### शब्दगंध क्र. ७०७१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | दा | ज | ■ | च | क | म | क |
| ब | र | ग | डी | ■ | व | ■ | स |
| र | वा | ■ | क | म | न | शि | बी |
| ■ | न | ध | ■ | न | ■ | क | ■ |
| म | ■ | व | प | न | ■ | र | म |
| फ | र | सा | ण | ■ | फ | ण | स |
| ल | ■ | ग | ती | ■ | की | ■ | ल |
| र | ब | र | ■ | ह | र | क | त |

**आडवे शब्द :-** १) मनाची स्वस्थता; आनंद; शंकानिवृत्ती ४) अमका; फलाणा ६) भित्रा; घाबरट ७) पूर्ण भरतीची वेळ ८) मौज; गायनातील एक राग; रंग ९) सरहद्द; सीमा; मर्यादा ११) आकाशतत्त्व; अंतराळ १३) खोटा; रिकामा; निरर्थक १६) लाकूड तासण्याचे सुताराचे हत्यार १८) सूर्य; भास्कर; रवि २०) एक पक्षी; पोपट; कीर २१) सोन्याचा पर्वत २२) जाळणे वगैरे प्रकारांनी केलेली नासाडी २३) घाण; विष्ठा

**उभे शब्द :-** १) सोशीक; सहन करणारा २) साहस; धैर्याचे काम ३) मवाळकी; मृदुता; मऊपणा ४) एक मोगल राजा ५) समाधी; थडगे; मकबरा १०) स्वत:ला उलटे टांगून घेणारा एक पक्षी १२) समूह; कळप (पक्ष्यांचा) १४) एक पक्षी; काग; वायस; कावळा १५) स्थिर; अचल १७) समस्त; सर्व; सारे १८) कामासहित; इच्छ धरून केलेले; इच्छा बाळगणारा १९) अक्षय खन्ना, ऐश्वर्या रॉय यांचा एक हिंदी चित्रपट २०) नृप; भूपती; नरेश

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** खूप मोठा अडथळा आला की समजावं आपण विजयाच्या जवळ आलो.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### कोळसा कसा तयार झाला?

पृथ्वी तिच्या जन्मा पासून अनेक स्थित्यंतरातून गेलेली आहे. प्रत्येक स्थीत्यन्तरा नंतर तिच्या स्वरुपात अमूलग्र बदल झालेले आहेत. तर अशाच एका काल खंडात पृथ्वीवर अधिकतर जमीन घनदाट जंगलानी व्यापलेली होती. कालखंडा विषयी फारशी माहीती अजून उलगाडता आलेली नाही. वनस्पति कश्या प्रकारची होती हेही नक्की सांगता येत नाही.

तर ही जंगले पृथ्वी वरील घडामोडी अंतर्गत जमिनीत खोल जशीच्या तशी गाडली गेली. गाडल्या गेलेल्या जंगलावर प्रचंड दाब (वरती असणाऱ्या थरांचा) व तापमानाचा भार अनेक युगे तसाच राहिला. व या जंगलाचे रूपांतर दगडी कोळश्यात झाले. पुढील कालखंडातील घडामोडीत काही थर पृष्ठभागा जवळ सरकले व काही गडलेलेच राहीले. या दगडी कोळश्याच्या थरामधे दगड, वाळूचे थरही आढळून येतात. म्हणजे जंगले गाडली जाण्याच्या घडामोडी अनेक वेळा घडल्या असाव्यात.

नैसर्गिक रित्या सर्व दगडी कोळसा एक सामान असत नाही. काही थरामधे गंधकचे प्रमाण जास्त असते. साधरणपणे २.५ ते ७ टक्के इतके गंधक आढळून येते. जीतके गंधक जास्त तीतके वायू प्रदूषण अधीक (अर्थात इंधन म्हणून जाळू तेंव्हा) तसेच काही थरामध्ये कार्बन युक्त घटक जास्त शुद्ध स्वरुपात आढळतात. असा कोळसा लोखंड/पोलाद निर्मितीसाठी आवश्यक असतो.

दगडी कोळश्याची प्रत त्या पासून मिळू शकणाऱ्या उष्मांका नूसार ठरवली जाते. कमी प्रतिचा दगडी कोळसा, उत्खनन केलेल्या ठीकाणीच स्वच्छ करून नंतर विद्युत निर्मीतिसाठी वापरला जातो. आर्थिक गणीताशी ही बाबा कुठला कोळसा वापरवा हे निगडित आहे.

### विहिरीचे पाणी

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा एक शेतकरी खूप काळजीत होता. त्याला आपल्या शेतात पाण्याची गरज होती. त्यामुळे तो अनेक दिवसांपासून विहीर शोधत होता. एकदा त्याला अचानक एक विहीर दिसली. ही विहीर त्याच्या शेताच्या अगदी जवळ होती. त्यामुळे शेतकऱ्याला मोठा आनंद झाला. आता आपला त्रास संपला असे त्याला वाटले. तसेच दुसऱ्या दिवशी तो पाणी घेण्यासाठी विहिरीवर पोहोचला. त्याने विहिरीजवळ ठेवलेली बादली विहिरीत टाकताच एक माणूस तेथे आला. तो शेतकऱ्याला म्हणाला, ''ही विहीर माझी आहे. तुम्ही त्यातून पाणी घेऊ शकत नाही. या विहिरीतून पाणी घ्यायचे असेल तर ही विहीर विकत घ्यावी लागेल''

हे ऐकून शेतकरी मनात विचार करू लागला की ही विहीर विकत घेतली तर मला कधीच पाण्याची कमतरता भासणार नाही आणि पाण्यासाठी इकडे तिकडे भटकावे लागणार नाही. आता दोघांमध्ये रक्कम ठरली. शेतकऱ्याकडे तेवढे पैसे नव्हते म्हणून, शेतकऱ्याने दुसऱ्या दिवशी पैसे देण्याचे सांगितले आणि घरी निघून गेला.

शेतकऱ्याने आपल्या जवळच्या व्यक्ती आणि मित्रमंडळींशी याबाबत चर्चा केली आणि विहिरीसाठी ठरलेल्या रकमेची व्यवस्था करण्यास सुरुवात केली. व त्याने रक्कम जमा केली. आता त्या माणसाच्या घरी पोहोचल्यावर शेतकऱ्याने त्याच्या हातावर पैसे ठेवले आणि विहीर विकत घेतली. आता विहीर शेतकऱ्याची होती त्यामुळे पाणी काढायला उशीर केला नाही. शेतकऱ्याने विहिरीतून पाणी काढण्यासाठी बादली उचलताच तो माणूस पुन्हा म्हणाला, ''थांबा, तुम्हाला या विहिरीतून पाणी काढता येणार नाही. मी तुला विहीर विकली, विहिरीतील पाणी अजूनही माझे आहे.''


शेतकरी हतबल झाला आणि न्यायासाठी तक्रार करण्यासाठी राजाच्या दरबारात गेला. तसेच अकबर राजाने शेतकऱ्याची संपूर्ण कहाणी ऐकली आणि नंतर विहीर विकलेल्या माणसाला आपल्या दरबारात बोलावले. राजाने त्याला विचारले, ''तू या शेतकऱ्याला तुझी विहीर विकलीस, मग त्याला पाणी का घेऊ देत नाहीस?''

तो माणूस म्हणाला, ''महाराज, मी त्यांना फक्त विहीर विकली होती, पाणी नाही.'' हे ऐकून राजाही विचार करू लागला. बराच वेळ विचार करूनही जेव्हा तो हा प्रश्न सोडवण्यात अयशस्वी ठरला तेव्हा त्यांनी बिरबलाला बोलावले.

बिरबल त्या माणसाला म्हणाला, ''ठीक आहे, तू विहीर विकलीस, पाणी नाही. मग शेतकऱ्यांच्या विहिरीत तुमचे पाणी काय? विहीर तुमची नाही, ताबडतोब विहिरीचे पाणी काढा.'' बिरबलाने हे सांगताच त्या माणसाच्या लक्षात आले की आता आपल्या हुशारीचा काही उपयोग होणार नाही. त्याने ताबडतोब राजाची माफी मागितली आणि विहिरीसह पाण्यावर शेतकऱ्याचा पूर्ण हक्क असल्याचे मान्य केले. हे पाहून अकबर राजाने बिरबलाच्या बुद्धिमत्तेचे कौतुक केले आणि विहीर विकणाऱ्या माणसाला फसवणूक केल्याबद्दल दंड ठोठावला.

**तात्पर्य :** स्वतःला इतरांपेक्षा हुशार समजू नये.

## रहमते दर्शन (भाग – १)



### प्रस्तावना

तो महाराज जी उन्हें अपनी सही सलाह व सही इलाज का मार्गदर्शन देकर उनकी मदद करते थे। उसके बाद किसी को बताये बगैर, महसूस कराये बगैर वो उनके कर्मों का भार अपने ऊपर ले लेते थे और अपने शरीर पर उस दर्द को सहन करते थे और नतीजे में वो लोग जाहिरा तौर पर चमत्कारी रूप से ठीक हो जाते थे। लोग ट्यूमर (गिल्टी की), साँस की तकलीफ, दमे की तकलीफ और पेट की बीमारियों और भी कई जानलेवा बीमारियों से अचानक ठीक हो जाते थे। ये उनकी दयालुता एवं दया – मेहर थी ।

महाराज जी इस बात का खास ख्याल रखते थे कि प्रत्येक व्यक्ति, जो भी उनके पास आये, वो उसका स्वागत प्यार से करें। ऐसा वो कभी उनसे सम्बन्धित प्रश्न करके, कभी ख़ूबसूरत मुस्कुराहट देकर, तो कभी उनकी पीठ पर, सिर पर, बाँह पर प्यार भरी थपकी देकर, कभी गले लगाकर, तो कभी जोर से ऊँची आवाज़ में उन्हें बुलाकर करते थे। चाहे कभी कोई उन्हें शारीरिक तौर पर मिल न सका हो, तब भी वो उन्हें महसूस करा देते थे, कि उनके पास (महाराज जी के उनके लिए भी प्यार भरा खूबसूरत तोहफा है, उनकी यादों के बक्से को भरने के लिए। ऐसा लगता था जैसे हम प्रेम के स्वर्ग में हों, जिसमें वो अपनी दया–मेहर के खजाने सदा लुटाते रहे।

उनके तरीके इतने निराले थे कि अगर वो किसी को अनुशासित भी करना चाहते थे या किसी को उसका व्यवहार ठीक करने का निर्देश भी दे रहे होते या किसी को उसके काम सुधारने के तरीके बताते तब भी वो इंसान के अन्दर इतना प्यार आँखों के जरिये डाल देते थे कि उसे महसूस ही नहीं होता था कि उसे किसी किस्म के निर्देश मिल रहें हैं या अनुशासन् सम्बन्धित सलाह दी जा रही है। वो इंसान अपने आप को सिर्फ उनके प्यार से नहाया हुआ, डूबा हुआ पाता था। उसका असर ये होता था कि उस प्यार से उस व्यक्ति के दिल के द्वार खुल जाते थे और वो शब्द उसमें धस जाते थे और वो महाराज जी की सलाह को अपनी ज़िन्दगी का हिस्सा बना लेता था। और दिल से उसे मानता था। इस प्रकार उनके प्यार के से जादू कितने ही लोगों के दिल बदल गये। प्यार ही शिक्षक था। जब कोई यह महसूस करता है कि उसे प्यार किया जा रहा है तो वो उस पर ज़्यादा ध्यान देता है क्योंकि वो इंसान महसूस करता है कि जो उसे प्यार करता है, वो उसका शुभचिन्तक है और सिर्फ उसका भला ही चाहता है, उसकी भलाई के लिए ही चिन्तित है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

### अंतरीक बल

है। कोई भी समस्या हो तो उसे लिखो और उसके हल लिखो। आप को सटीक हल आ जाएगा। दिमाग आजीवन आप की मदद के लिए तैयार रहता है। दिमाग आकर्षण की शक्ति का माध्यम है। जब आप का ध्यान अपने लक्ष्य पर होता है। दिमाग ऐसे विचार भेजता है जो आप को एक चुंबक में बदल देता है। दिमाग के पास आप की सारी समस्याओ का हल है।

समय प्रबन्धन और समस्या समाधान

हमें पल– पल समस्याओं का सामना करना पड़ता है। समस्याओं से निपटने में बहुत समय नष्ट होता है। अगर हम दिमाग का प्रयोग करें तो समय बचा सकते हैं। दिमाग सही समय पर सही हल देता है। जब भी कोई बाधा आये तो दिमाग से सोचें इसका हल क्या है और दूसरा इस बाधा से शिक्षा क्या मिली।

आप को दिमाग की बात सुन कर इसके अनुसार चलना आ जाए तो आप से कभी कोई भूल नहीं होगी। दिमाग को जगाने के २० आडिया मेथड का प्रयोग करें। आप का कोई भी प्रश्न है, समस्या है, लक्ष्य है, उसे लिख लें। फिर प्रत्येक समस्या के २० हल लिखें जो आप को लगता है कि आप के हिसाब से ठीक हैं। जब आप हर समस्या के २० हल लिखने में कामयाब हो गये तो एक जादू सा घटेगा। लोगों और परिस्थितियों को अपनी ओर आकर्षित करने लगेंगे। आप मनचाहे लक्ष्य प्राप्त करने लगेंगे। इस के लिए सिर्फ निन्दा, आलोचना या उपहास करने से बचें। आप वास्तव में जीनियस हैं। अगर अब तक नहीं हैं तो फिर से जीनियस बन सकते हैं। बस हर रोज थोड़ा सा समय एकांत और मनन के लिए निकालें। यह इसलिए हैं क्योंकि प्रत्येक व्यक्ति के जीवन में समस्याओं, कठिनाइयों और नाकामयाबियों का सिलसिला चलता रहता है। हम हर घंटे, हर दिन ऐसे निर्णय लेते हैं जो किसी न किसी तरह हमारे जीवन को प्रभावित करते हैं। आप वही बनते हैं, जो आप लगातार सारा दिन सोचते हैं। सफल व्यक्ति दूसरे से अलग सोचता है। प्रसन्न व्यक्ति सिर्फ यह सोचता है कि लक्ष्य कैसे पाए । निराश व्यक्ति सिर्फ अपनी समस्याओं के बारे में बात करते हैं। अगर समस्याओ के बारे सोचते रहेंगे तो समस्याएं कई गुणा बढ कर सामने आएगीं। किसी भी समस्या का हल सबसे सादा और सरल होता है। आप अपने लक्ष्य तक क्यो नहीं पहुंचे। इसका कारण हम दूसरों को दोषी मानते हैं। दूसरों को दोष देना एक बहाना है। जितनी पावर से एक बल्ब जलता है, उतनी ही पावर को लेजर बीम की तरह प्रयोग कर के लोहा काटा जा सकता है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

* सी.डी. ऐकणे (दुपारी ४.३० ते ५.३० वा.) : घरातील इतर कामे करावीत व कामे करीत असताना गर्भसंस्कार सी.डी. ऐकावी.

* परमेश्वरचिंतन :

संध्याकाळी देवाजवळ दिवा लावून प्रार्थना करावी. शुभंकरोती, रामरक्षा स्तोत्र म्हणावे. तसेच गणपती स्तोत्र, अथर्वशीर्ष, सरस्वती स्तोत्र यांचे आलटून पालटून वाचन करावे. सर्वांत शेवटी शांतीमंत्र म्हणावा. देवाजवळ आपल्या व बाळाच्या रक्षणासाठी प्रार्थना करावी. प्रार्थना झाल्यानंतर घरातील सदस्यांबरोबर मैत्रिणींबरोबर संवाद साधवा व त्यानंतर संध्याकाळचा स्वयंपाक घरातील इतर कामे करावीत. मोठे मूल असल्यास त्याचा अभ्यास घ्यावा. घरातील वातावरण प्रसन्न असावे.

* सूप पिणे (६.०० वा.) :

दुधी भोपळ्याचे सूप, मक्याच्या दाण्यांचे सूप, मूगाचे सूप गरम-गरम प्यावे. यामध्ये सकस, पोषक, आरोग्यदायी घटक भरपूर प्रमाणात असतात.

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

* रात्रीचे जेवण (८.०० ते ८.३० वा.) :

रात्रीचे जेवण लवकर करावे. घरातील सर्व सदस्यांनी मिळून, पतीसोबत आणि मोठे अपत्य असेल, तर अपत्यासोबत रात्रीचे जेवण करावे. जेवण हलक्या स्वरूपाचे असावे. पालेभाज्यांची पोळी, थालीपीठ त्यासोबत नारळाची, पुदिन्याची चटणी खावी. मुगाच्या डाळीची खिचडी, सर्व भाज्या टाकून केलेला पुलाव त्यावर साजूक तूप टाकून खावा. दोनही जेवणामध्ये साजूक तुपाचा वापर १ चमचा करावा. तूप हे अग्निप्रदीप्त करणारे व बाळाची बुद्धी तेजस्वी करणारे असते.

* **गुजगोष्टी (८.३० ते ९.३० वा) :** जेवणानंतर शतपावली करावी; लगेचच झोपू नये. रेडिओ ऐकणे, टि.व्ही. वरील एखादा चांगला कार्यक्रम बघणे, संगीत ऐकणे. घरातील सदस्यांबरोबर, पतीबरोबर गप्पा मारणे या गोष्टी कराव्यात. घरामध्ये वादविवाद-भांडण टाळावे.

**१९. रात्रीची विश्रांती (९.३० ते १०.०० वा.) :** रात्री झोपण्यापूर्वी शतावरीकल्प घालून १ ग्लासभर दूध प्यावे. त्यानंतर भावी माता-पित्याने गर्भस्थ बाळाशी सुसंवाद साधावा. निवांत वेळ असल्यामुळे बाळाशी शांतपणे सुसंवाद साधता येतो. बाळाशी संवाद झाल्यानंतर 'बाळा, रात्र झाली आहे, आता लवकर झोपी जा. सकाळी लवकर उठायचे आहे', अशी सूचना करुन एखादे अंगाई गीत गुणगुणावे व स्वत: देखील शरीर शिथिल करुन; मनातील विचार कमी करुन दीर्घश्वसन करावे व झोपी जावे.

अशा प्रकारे दिनक्रम सांगितल्यानंतर शमिकाच्या चेहऱ्यावर हास्यभाव उमटले व खरोखरच 'डॉक्टर, तुम्ही वेळेचे किती छान नियोजन सांगितले. आता मी सर्व कामे दिनक्रम ठरवून करेन' असे मला ती म्हणाली.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# जिल्हास्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धा उत्साहात, २५० खेळाडूंचा सहभाग

## गुळवे, भंडारी, आजबे, पठाण, चौधरी यांनी गाजवली स्पर्धा



जिल्हास्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेत २५० खेळाडूंनी सहभाग घेतला.

नगर – जिल्हास्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेत २५० खेळाडूंनी सहभाग नोंदवत गुलाबी थंडीत धावले. तर दमदार कामगिरी करत प्राविण्य मिळवून सदर स्पर्धा गाजवली. अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा परिषद, अहमदनगर जिल्हा थलेटिक्स असोसिएशन व अहमदनगर जिल्हा ऑलिंपिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वाडीया पार्क जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रीडा सप्ताह निमित्त जिल्हास्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा. सुनील जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोलनकर, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, प्रियंका खिंडरे, जिल्हा सचिव दिनेश भालेराव, अहमदनगर ऑलम्पिक असोसिएशनचे सचिव शैलेश गवळी, महाराष्ट्र राज्य सायकलिंग असोसिएशनचे सचिव संजय साठे, क्रीडा शिक्षक महासंघ अध्यक्ष राजेंद्र कोतकर आदी उपस्थित होते. मोठ्या संख्येने सहभाग नोंदवलेल्या खेळाडूंनी स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करुन यश प्राप्त केले.

१६ व १८ वर्ष गटातील प्रथम दोन तर २० वर्ष व खुल्या गटातील पहिले सहा क्रमांकाचे खेळाडू अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा सचिव दिनेश भालेराव, श्रीरामसेतु आवारी, अविनाश काळे, अमित चव्हाण, विश्वेषा मिस्किन, समीर शेख, तुकाराम मरकड यांनी परिश्रम घेतले.

जिल्हास्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे – १६ वर्षाखालील मुले प्रथम– सार्थक आजबे, द्वितीय– सर्वेश दळवी, तृतीय– विवेक मुळे. मुली–प्रथम – प्रिया गुळवे, द्वितीय – गौरी कुलाळ, तृतीय –स्मितल नागपुरे.

१८ वर्षाखालील मुले प्रथम –आयान पठाण, द्वितीय– सम्यक राजगुरू, तृतीय –दीपक पवार. मुली प्रथम– रिद्धी सप्रे, द्वितीय– दीक्षा राजगुरू, तृतीय– श्रुतिका भवर.

२० वर्षाखालील मुले प्रथम– मयूर चव्हाण, द्वितीय– कृष्णा गायके, तृतीय– मयूर आवारे, चतुर्थ– शंकर मरकड, पाचवा– सुरज कदम, सहावा– प्रसाद सुरवसे. मुली प्रथम– साक्षी भंडारी, द्वितीय– ऐश्वर्या काकडे, तृतीय– किरण सांगळे, चतुर्थ– योगिता पवार, पाचवा– शितल देवडे.

खुला गट पुरुष– प्रथम किशोर मरकड, द्वितीय– लक्ष्मण कळमकर, तृतीय– ईश्वर झिरवाळ, चतुर्थ– आकाश शेरवाले, पाचवा– प्रतीक कलापुरे, सहावा– ज्ञानेश्वर वायकर. खुला गट महिला प्रथम– गायत्री डांगे, द्वितीय– नेहा पवार, तृतीय– कीर्ती नांगर, चतुर्थ– साक्षी मोरे.

# न्यू आर्टस्‌च्या कला शाखेतील अनुज्ञ वराडेला दिल्लीतील'राज भार्गव फाउंडेशन स्कॉलरशिप'




न्यू आर्टस्‌च्या कला शाखेतील अनुज्ञ वरडेला दिल्लीतील'राज भार्गव फाउंडेशन स्कॉलरशिप' मिळाली.

नगर – न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता १२वी कला शाखेचा माजी विद्यार्थी अनुज्ञ अभिजित वराडे यांना हिंदू विश्वविद्यालय, दिल्ली यांच्या वतीने इतिहास विषयातील 'राज भार्गव फाउंडेशन स्कॉलरशिप' तसेच लेनोवो कंपनीचा लॅपटॉप, पाच दिवस राजस्थान सहल व पदवी पर्यंत प्रतिवर्ष एक लाख रुपये रोख रक्कम स्कॉलरशिप साठी निवड झाली आहे.

या शैक्षणिक वर्षाचा रु. १ लाखाचा धनादेश राज भार्गव यांच्या हस्ते देण्यात आला. ही स्कॉलरशिप मिळवणारा अनुज्ञ वराडे हा कला शाखेतील मराठी माध्यमाचा विद्यार्थी आहे. त्याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून यश मिळवले आहे. त्याने एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत ८९.१७% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला होता.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा.कल्पना दारकुंडे, पर्यवेक्षक प्रा.सुभाष गोरे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# 'सोनी गिफ्ट्स' च्या वर्धापनदिनानिमित्त सर्व वस्तूंच्या खरेदीवर ५० टक्के सवलत

## लाडक्या बहिणींना खास गिफ्ट




नगर – नाशिकमधील ५ दशकांपासून प्रसिद्ध असलेले सोनी गिफ्टस ची. नगरमधील फ्रँचाईसी डी बी वेंचरसच्या पाचव्या वर्धापन दिना–निमित्त या दालनात लाडक्या बहिणींना १८ ते २५ डिसेंबर या कालावधीत विविध कंपन्यांच्या ब्रॅण्डेड वस्तूंवर थेट फ्लॅट ५० टक्केपर्यंत सवलत दिली जाणार आहे. तसेच काही निवडक वस्तूंवर थेट ६० टक्केपर्यंत सूट दिली जाणार आहे. नवीन वर्षाचे स्वागत आपल्या घर संसारासाठी मनपसंत खरेदी करण्याची संधी लाडक्या बहिणींना मिळाली आहे.

सोनी गिफ्टचे प्रशस्त दालन पाच वर्षांपासून नगरकरांच्या पसंतीस उतरलेले आहे. एकाच छताखाली आकर्षक गिफ्ट आर्टिकल्स, घरगुती वापराच्या वस्तू, गृह सजावट, होम अप्लायंसेस उपलब्ध असल्याने खरेदीचा निखळ आनंद ग्राहकांना घेता येतो. कुटुंबातील लहानांपासून ज्येष्ठापर्यंत प्रत्येकाला जे हवं ते सर्व काही उपलब्ध आहे. याशिवाय उत्कृष्ट आपुलकीची सेवा मिळत असल्याने ग्राहक खरेदीसाठी सोनी गिफ्टमध्ये येतात. ग्राहकांचे प्रचंड प्रेम आणि प्रतिसाद लक्षात घेवून या दालनाने पाचवा वर्धापन दिन साजरा करताना ग्राहकांना अनोखी भेट दिली आहे. यातून ग्राहकांशी असलेले ऋणानुबंध आणखी घट्ट करण्याचा प्रयत्न असल्याचे सोनी गिफ्टच्यावतीने सांगण्यात आले.

लाडक्या बहिणींनी कुटुंबियांसह दालनाला भेट देवून खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रयत्न केल्यास मनुष्य आपली परिस्थिती बदलू शकतो

## राजाभाऊ कोठारी यांचे प्रतिपादन; श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानच्यावतीने दत्त जयंती निमित्त गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप



श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानच्यावतीने दत्त जयंती निमित्त गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले.

नगर – जगात गरीब श्रीमंत असे कुणी नसते. फक्त प्रत्येकाची परिस्थिती वेगळी असते आणि प्रयत्न केल्यास मनुष्य आपली परिस्थिती बदलू शकतो. मुलांनी भविष्यात खूप प्रगती करावी आणि आपल्याला मोठे करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या आई–वडिलांच्या कार्याची जाणीव ठेवावी व त्यांना कधीही अंतर देऊ नये. शाळेपासून पाच–सहा कि.मी. पायपीट करत जाणाऱ्या मुला–मुलींसाठी सायकल उपलब्ध करून देणे, हे महत्त्वाचे पाऊल म्हणायला हवे, शाळा घरापासून दूर आहे, यामुळे एकही मुलगा–मुलगी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानचे जी तळमळ आहे, ती खरोखरच कौतुकास्पद असल्याचे मंगल भक्त सेवा मंडळचे राजाभाऊ कोठारी व्यक्त केले.

श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानच्या वतीने श्री दत्त जयंती औचित्य साधून गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले. याप्रसंगी श्री. कोठारी बोलत होते. यावेळी अरविंद शिंदे, संदीप दांतरंगे, अनिकेत चव्हाण, सुमित इपलपेल्ली, प्रकाश कोटा, विजय सब्बन आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना कोठारी म्हणाले कि, श्री दत्त जयंती उत्सव म्हणजे आता या नगर शहराची एक ओळख बनली आहे. या उत्सवाच्या माध्यमातुन गरजू लोकांना मोठा लाभ होत आहे. धार्मिक उत्सव म्हंटल कि धार्मिक विधी, विविध पुजा–अर्चा, भजन, किर्तन या पलीकडे जाऊन प्रतिष्ठानच्या या कार्यक्रमांना सामाजिक उपक्रमांची जोड देऊ केल्यामुळे आज अनेकांना याचा लाभ होत आहे.

प्रास्तविकात प्रतिष्ठानचे श्रीनिवास इपलपेल्ली व योगेश ताटी म्हणाले की, श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठाच्यावतीने गेल्या २१ वर्षापासून दत्त जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात येते आहे. या २२ व्या वर्षी दत्त जयंती उत्सवाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी म्हणून प्रतिष्ठानच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. शिक्षण घेणार्या गरीब व गरजवंत विद्यार्थ्यांची अडचण ओळखुन प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी सायकल वाटप, शैक्षणिक साहित्य वाटप असे अनेक सामाजिक उपक्रम राबवुन विद्यार्थ्यांना मदत केली जाते. यावर्षी दत्त जयंती निमित्त ४ गरीब व गरजवंत विद्यार्थ्यांना नवीन सायकल देण्यात आले. या उपक्रमास संजय आडेप, साईनाथ चिंता, राहुल गुंडू, सुमित इप्पलपेल्ली, श्रीनिवास बोगा, विशाल गाजूल यांनी सहकार्य केले.

सुत्रसंचालन शुभम बुरा यांनी केले. तर आभार रमेश गुंडू यांनी केले.

उपक्रम यशस्वीतेसाठी सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान व निलाबंरी महिला मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# अहमदनगर रोटरी क्लबतर्फे अविनाश देडगावकर सन्मानित



नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर तर्फे निस्वार्थपणे ४५ वर्षांपासून ऊन वारा पाऊस न पाहता दिवस रात्र उल्लेखनीय समाजसेवा करत असल्यामुळे त्याची दखल घेऊन १५ डिसेंबर रोजी नगर येथील एम.आय.डी. सी. तील साईबन येथे डॉ. सुरेश साबू यांच्या हस्ते सन्मानपत्र, पुष्पगुच्छ, शाल घालून समाजसेवक अविनाश देडगांवकर यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी सर्व श्री. सौ. निर्मला साबू रोटरी, क्लबचे अध्यक्ष नितीन थाडे, डॉ. प्रकाश कांकरीया, डॉ. सुधा कांकरीया, प्रसन्न खाजगिवाले, सुभाष गरजे, माधव देशमुख, सुहास क्षिरसागर, रविंद्र राऊत, पुरुषोत्तम जाधव, हर्षवर्धन सोनवणे, नेहा जाधव, सौ. क्रांती जहागिरदार व काही शाळेतले विद्यार्थी उपस्थित होते.

# निष्काम कर्मातून मोठे आत्मिक समाधान

## प्रशांत खैरे यांचे प्रतिपादन



महाराष्ट्र होमगार्ड संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रमाचे पोलीस मुख्यालय लॉन्स येथे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे.

### होमगार्ड वर्धापन दिन उत्साहात साजरा

नगर – कोरोना काळात जीवन हे किती क्षणभंगुर आहे, हे आपण अनुभवले आहे. दुसऱ्याने आपल्यासाठी काय केले, त्यापेक्षा आपण दुसऱ्या व्यक्ती साठी काय करतो त्यास महत्त्व आहे. प्रत्येकाने निष्काम कर्म करण्याची सवय लावल्यास मोठे आत्मिक समाधान मिळेल, असे प्रतिपादन अप्पर पोलिस अधिक्षक प्रशांत खैरे यांनी केले.

महाराष्ट्र होमगार्ड संघटनेचा ७८ वा वर्धापन दिनानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रमाचे पोलीस मुख्यालय लॉन्स येथे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, वृक्षारोपन राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी भूषवले. यावेळी उमेश परदेशी (राखीव पोलीस निरीक्षक), जी.पी. सोनवणे, (प्रशासकिय अधिकारी), बी. आर. हरवणे (प्र तालुका समादेशक अधिकारी), भिवा चौधरी, संजय शिवदे, (क्रेद्र नायक) भारत आत्रे, श्रीमती गायकवाड मॅडम, अण्णा पारदे, संतोष शिंदे, दिलीप भोसले आदी उपस्थित होते.

खैरे म्हणाले की, पोलीस दलातील महत्त्वाचा केंद्रबिंदू होमगार्ड असून, २६/११ मध्ये झालेल्या हल्ल्यात होमगार्ड यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. होम गार्ड संघटनेचे कार्य कौतुकास्पद असुन, आपणही आपला आहार, हेल्थ, साठी नेहमी जागृत राहुन, व्यसनापासून दूर राहिले पाहिजे. आपल्या प्रगतीसाठी दररोज सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. रक्तदान शिबिऱ्यातून गरजू रुग्णांना मोठी मदत मिळेल. जनकल्याण रक्त पेढीच्या माध्यमातून २५ होमगार्ड तसेच महिला होमगार्ड यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी आणा पारधे, दिलीप भोसले, संतोष शिंदे यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक व आभार बि.आर. हरवणे यांनी केले.

# सवाई गंधर्व महोत्सवात नगरची कु. आदिती गराडे झळकणार



नगर – अहमदनगर जिल्ह्यातून सवाई गंधर्व महोत्सवात हार्मोनियम वादन करणारी आजपर्यंतची ही पहिलीच महिला वादक ठरलेली असून हे तिचे उत्तुंग यश मानले जात आहे. कु. आदिती रमेश हार्मोनियमचे संस्थापक भजन सम्राट आणि हार्मोनियम मेकर व वादक आनंदराव रंगनाथ गराडे आणि महावितरण मधील निवृत्त अधिकारी मधुकर रामदास सांबरे यांची नात असून रेणावीकर विद्या मंदिर मधील शिक्षिका सौ. स्वाती दत्तात्रय गराडे यांची कन्या आहे.

वयाच्या पाचव्या वर्षापासून सुरू झालेल्या या तिच्या सांगितिक प्रवासात तिला सौ. रोहिणी कुलकर्णी, संपदा चौधरी, कुमुदिनी बोपर्डीकर, धनश्री खरवंडीकर आणि प्रमोद मराठे यासारख्या गुरूंचे आणि दिग्गजांचे मार्गदर्शन लाभलेले आहे.

# दर्गा दायरा येथील हजरत पिर सरकार शहा शरीफ (रहे) यांचा संदल व उर्स



नगर – सालाबादप्रमाणे हजरत पिर सरकार शहा शरीफ (रहे) दर्गा दायरा अहमदनगर यांचा संदल १८ डिसेंबर रोजी व उर्स १९ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टचे चेअरमन शेख मोहम्मद साबीर लाडमोहम्मद यांनी दिली.

हजरत पिर सरकार शहा शरीफ (रहे) दर्गाचा संदल व उर्स ट्रस्टचे वतीने साजरा करण्यात येणार आहे. १८ डिसेंबर रोजी पहाटे ४.३० वाजता पांरपारिक धार्मिक पद्धतीने दर्ग्यावर संदल लावून व फुलांची चादरी अर्पण करून धार्मिक फातेहा पठण करून नारीजा व शेरणी या प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे, तसेच १९ डिसेंबर रोजी उर्स साजरा करण्यात येणार आहे.

दर्गा परिसरात खाद्यपदार्थ, खेळणी विक्रेते व दुकाने लावण्यास ट्रस्टच्या वतीने कोणासही परवानगी मिळणार नाही. विक्रेत्यांनी दर्गा आवाराबाहेर आपली दुकाने लावावीत, तसेच भाविकांनी नियमांचे पालन करुन ट्रस्टला सहकार्य करावे, असे अहवान ट्रस्टचे चेअरमन शेख मोहम्मद साबीर लाड मोहम्मद, विश्वस्त अ‍ॅड. शेख हाफिज एन. जहागीरदार, शेख निजाम शरीफमियाँ, डॉ. सय्यद समीर शहा महेमूद, शेख नौशाद बाबामियाँ, सय्यद अत्तामियॉ पाशामियॉ व सय्यद साबीर दरवेशमियाँ, तसेच समस्त वशंज दर्गादायरा गावकरी यांनी केले आहे.

# बाळासाहेब पवार स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धेतून चांगले खेळाडू निर्माण होत आहे

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व आंजनेय प्रतिष्ठान आयोजित स्पर्धेचे उद्घाटन



अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व आंजनेय प्रतिष्ठान आयोजित बाळासाहेब पवार स्मृती करंडक जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना आ. संग्राम जगताप आदी. (छाया – लहू दळवी)

नगर – जिल्ह्यामध्ये चांगले क्रिकेटर निर्माण करण्यासाठी बालवयातच क्रिकेटचे धडे मिळावेत यासाठी लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन होणे गरजेचे आहे, गेल्या ८ वर्षापासून बाळासाहेब पवार स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धेतून चांगले खेळाडू निर्माण होत असून १९ वर्षाखालील भारतीय संघात किरण चोरमले आणि अनुराग कवडे हे दोन खेळाडू खेळत असून ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे, चांगले खेळाडू निर्माण व्हावेत यासाठी चांगल्या मैदानाची गरज असते म्हणून राज्य शासनाच्या माध्यमातून वाडिया पार्क क्रीडा संकुलनासाठी मोठा निधी प्राप्त करून दिला असून लवकरच कामाला देखील सुरुवात होणार आहे, शालेय शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्रीडा क्षेत्राकडे वळावे यामध्ये करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहे, जिद्द चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, कपिल पवार यांनी आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी खेळाडूंना स्पर्धेच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. कै. बाळासाहेब पवार यांनी क्रॉम्प्टन क्रिकेट स्पर्धेला सुरुवात करून नावारूपाला आणली आणि चांगले खेळाडू निर्माण केले व क्रिकेटचे महत्व पटवून देण्याचे काम केले असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले

वाकोडी येथील साईदीप मैदानावर अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व आंजनेय प्रतिष्ठान आयोजित बाळासाहेब पवार स्मृती करंडक जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे महणुन आनंदऋषी हॉस्पिटलचे डीएम कार्डिओलॉजिस्ट डॉ. राहुल अग्रवाल, रणजीपटू अनुपम संकलेचा, सुमतीलाल कोठारी, प्रा. माणिकराव विधाते, गणेश गोंडाळ, अरुण नाणेकर, डॉ. राहुल पवार, कपिल पवार, पी. डी कुलकर्णी, संदीप पवार, दिलीप पवार, संदीप घोडके, निखिल पवार, अजय कविटकर, सोमनाथ नजान, भरत पवार, डॉ. सतीश फाटके, हेमंत मुळे, क्रीडा अधिकारी आकाश थोरात, गौरव पितळे, अभिजीत विधाते, अमोल घोलप, सचिन पालवे, पंकज कुताळ, सुनील देवकर, मधुकर देशपांडे, सरफराज बांगडीवाला, स्वामिनी बेल्हेकर, छगन ठोकळ, एडवोकेट रमेश सुपेकर, हेमंत सोनवणे, उमेश ठाणगे, गौतम शिंगी उपस्थित होते

कपिल पवार म्हणाले की बाळासाहेब पवार स्मृती करंडक जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेला ८ वर्ष पूर्ण झाली असून या स्पर्धेमध्ये १४, १६ व १९ वर्षाखालील खेळाडू खेळत असून पहिल्यांदाच गुलाबी चेंडूवर ही स्पर्धा पार पडत आहे या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातील सुमारे ४५० क्रिकेटर आपल्या खेळाचे प्रदर्शन करणार आहे, १९ वर्षाखालील गटात ८ संघ सामील झाले असून हे सामना २० षटकांचे होणार असून १४ व १६ वर्षाखालील मुलांना क्रिकेटचे अचूक ज्ञान मिळावे जास्त वेळ मैदानावर थांबता यावे यासाठी ४० षटकांचा सामना होणार आहे यात १४ वर्षाखालील गटात १२ संघ सामील झाले तर १६ वर्षाखालील गटात ८ संघ सामील झाले आहे. हे सर्व सामने बाद पद्धतीने खेळविले जात आहे स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडू घडला जात असतो त्यासाठी बाळासाहेब पवार स्मृति करंडक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे असे ते म्हणाले.

बाळासाहेब पवार स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धा सुरू झाली असून क्रिकेटर आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत आहे, आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या नियमाप्रमाणे ही स्पर्धा होत असल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये चांगले खेळाडू निर्माण होतील, आपल्या खेळाडूंना चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्यास नक्कीच चांगले खेळाडू निर्माण होतील असे मत डॉ. राहुल अग्रवाल यांनी व्यक्त केले. यावेळी सुमतीलाल कोठारी, प्रा. माणिकराव विधाते आदींची भाषणे झाली. प्रास्ताविक अरुण नाणेकर यांनी केले तर आभार डॉ. राहुल पवार यांनी मानले

# नगर शहरातील नगरोत्थान योजनेतील २४ पैकी १३ रस्त्यांची कामे ४५ टक्के पूर्ण

## उर्वरित कामेही लवकरच सुरू होणार; प्रशासक यशवंत डांगे यांनी घेतला आढावा



नगरोत्थान योजनेतील रस्त्यांच्या कामांची पाहणी करताना प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे.

नगर – शहरातील प्रमुख २३ रस्ते व १ नाल्याच्या कामासाठी शासनाने १५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. यातील १३ रस्त्यांची कामे प्रगती पथावर असून ही कामे ४५% पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामही लवकरच सुरू होत आहेत. महानगरपालिके मार्फत शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालातील इतर कामांसाठीही लवकरच निधी उपलब्ध होणार आहे. सध्याच्या कामांसाठी जानेवारी २०२६ अखेर मुदत आहे. मात्र ही कामे मुदतीपूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

आयुक्त डांगे यांनी शहरात सुरू असलेल्या प्रमुख रस्त्यांच्या कामांचा आढावा घेतला. शासनाने २४ कामे मंजूर केलेली आहेत. त्यात २३ रस्त्यांची कामे व १ नाल्याचे काम आहे. सध्या १३ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. ही कामे भौतिक दृष्ट्या ४५% पूर्ण झालेली आहेत. तर आर्थिक दृष्ट्या ३०% पूर्ण झाली आहे. या २३ रस्त्यांच्या माध्यमातून सुमारे १७ किलोमीटर लांबीचे रस्ते होणार आहेत. तर दोन किलोमीटर लांबीच्या नाल्याचे सुशोभीकरण होणार आहे.

सदर कामे विकास योजनेतील रस्त्यावर असल्याने विकास योजनेच्या रुंदीप्रमाणे होत आहेत. त्यात अडथळा ठरणारी अतिक्रमण काढणे, इलेक्ट्रिक लाईन, पाण्याची लाईन स्थलांतरीत करून दोन्ही बाजूने गटार करून काँक्रिटीकरण प्रस्तावित आहे. या कामांकरिता जुलै २०२४ महिन्यात कार्यादेश देण्यात आलेला आहे. कामाची मुदत जानेवारी २०२६ पर्यंत आहे. मात्र, मुदतपूर्व कामे पूर्ण करण्याचा संकल्प महानगरपालिकेने केला आहे. त्या दृष्टीने प्रयत्न असून मनपा आर्थिक दृष्ट्या व प्रशासकीय दृष्ट्या सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सक्षम असल्याचेही त्यांनी सांगितले.

सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होणार आहे. शहराच्या सौंदर्यात देखील भर पडणार आहे. त्याचबरोबर वारंवार रस्त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची वेळ मनपावर येणार नाही. नागरिकांना चांगली सेवा उपलब्ध होईल. आत्तापर्यंत शासकीय अनुदानातील २१ कोटी रुपये व मनपा हिस्स्यातील ४.५० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. उर्वरित हिस्स्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. लवकरच शासनाकडून पैसे भरण्यासाठी तरतूद करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संघ फेडरेशनच्या निमंत्रित संचालकपदी जयंत वाघ यांची नियुक्ती



महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संघ फेडरेशनच्या निमंत्रित संचालकपदी जयंत वाघ यांना नियुक्तीपत्र देताना संघाचे अध्यक्ष संजीव कुसळकर.

नगर – पुणे येथील महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संघ मर्यादित या संस्थेच्या राज्य पातळीवरील निमंत्रित संचालकपदी अहमदनगर जिल्हा मजूर फेडरेशनचे माजी संचालक जयंत वाघ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघाचे अध्यक्ष संजीव कुसळकर यांच्या सहीने त्यांना नुकतेच हे पत्र प्रदान करण्यात आले. अहमदनगर जिल्हा मजूर संस्थांचा संघ यांच्या वतीने राज्य पातळीवर जयंत वाघ यांच्या नावाला या पदावर नियुक्तीसाठी प्राधान्य देण्यात आले होते. त्यांच्या निर्देशानुसार राज्य संघाने त्यांची या पदावर नियुक्ती केली.



जयंत वाघ हे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, मजूर आणि कामगार क्षेत्रात विविध संस्थांच्या पदांवर सक्रिय आहेत. अहमदनगर जिल्हा मजूर फेडरेशनचे तीन वेळा ते संचालक राहिलेले आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील मजूर सहकारी चळवळीतील अनुभवी कार्यकर्ते आणि नेतृत्व म्हणून त्यांची निवड या पदावर करण्यात आली. जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांच्या कामकाजातील अडचणी सोडवण्यासाठी आणि कामकाजातील माहिती राज्य फेडरेशनला व्हावी यासाठी राज्य सहकारी मजूर संघाच्या संचालक मंडळाच्या बैठकीसाठी त्यांना विशेष निमंत्रित यापुढे करण्यात येणार आहे.

जिल्हा मजूर सहकारी संघाचे माजी संचालक जयंतराव वाघ महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संघाचे फेडरेशनच्या निमंत्रित संचालकपदी नियुक्ती झाल्याबद्दल संघाचे चेअरमन अर्जुनराव बोरुडे, व्हाईस चेअरमन विकास उर्फ विकि जगताप, ज्येष्ठ संचालक अनिलराव (मामा) पाचपुते, व्यवस्थापक प्रकाश कराळे तसेच सर्व संचालक मंडळ, सभासद संस्था, कर्मचारी वृंद यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# जिल्हा सहकारी बँकेचे शिवाजीराव कर्डिले यांना 'बेस्ट चेअरमन ऑफ दि इयर पुरस्कार' प्रदान



बँकेचे चेअरमन आमदार शिवाजीराव कर्डिले यांना २०२४ बेस्ट चेअरमन ऑफ दि इयर पुरस्कार प्रदान करताना अखिल भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाचे अध्यक्ष दिलीप संघवी, गोवा राज्य सहकारी बँकेचे चेअरमन उल्हास फल देसाई, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे.

गोवा – राज्य सहकारी बँका (SCB) आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (DCCB) यांच्या साठी इनजेनियस लीडरशिप समिट देशपांतळीवरील आयकॉनिकलीडर अवॉर्ड २०२४ या वर्षी गोव्यातील विंडफ्लॉवर रिसॉर्ट आणि स्पा वर्का या पंचतारांकित रिसॉर्ट येथे झाला.

२०२४ चा देशपांतली वरील जिल्हा सहकारी बँकेत केलेल्या उत्कृष्ठ कामगिरी बद्दल उत्कृष्ट चेअरमन म्हणून अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन आमदार शिवाजीराव कर्डिले यांना २०२४ बेस्ट चेअरमन ऑफ दि इयर चा पुरस्कार अखिल भारतीय राट्रीय सहकारी संघ, नवी दिल्लीचे चेअरमन दिलीप संघवी यांच्या हस्ते देण्यात आला.

याप्रसंगी गोवा विधानसभा अध्यक्ष अनंत शेट, गोवा राज्याचे नामदार सुभाष फल देसाई, मंत्री समाज कल्याण, नदी व जलवाहतूक आणि पुरातत्व शास्त्र तसेच भारतातील राज्य सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँकांचे अध्यक्ष, सीईओ, अधिकारी उपस्थित होते.

पुरस्कार स्विकारल्यानंतर जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन आमदार शिवाजीराव कर्डिले म्हणाले, जिल्हा बँकेवर विश्वास ठेऊन रुपये दहा हजार कोटीच्या वर ठेवीदरांनी ठेवी ठेवल्या असून जवळपास साडेसात हजार कोटीचे कर्ज येणी बाकी असून मी जिल्हा बँक व सामाजिक कार्याच्या माध्यमातून शेतकरी व समाजातील शेवटचा घटकांची सेवा करण्याचे कार्य केल्याने मला हा पुरस्कार मिळाला. राजकीय जीवनात हा पहिलाच पुरस्कार असल्याचेही माहिती यांनी दिली.

# श्री स्वामी समर्थ मंदिरात दत्त जन्मोत्सवाची महाप्रसादाने सांगता



गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात दत्तजन्म उत्सव सांगता महाप्रसादाने झाली. यावेळी भाविकांनी मोठी गर्दी केली होती (छाया – विजय मते)

नगर – सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात श्री दत्त जन्मोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. यानिमित्त श्री गुरुचरित्र सामुदायिक पारायण सोहळा झाला. यामध्ये महिलांनी सहभाग नोंदविला.

श्री दत्त जन्मोत्सवात सायंकाळी सहा वाजता सजविलेल्या पाळण्यात श्री दत्तात्रय मूर्ती ठेऊन महिलांनी पाळणा गात जन्मउत्सव साजरा केला. यावेळी भक्ती संगीताचा कार्यक्रम पार पडला. सौ. ऋतुजा पाठक यांनी दत्त जन्मावर भक्ती गीते सादर केली त्यांना सहगायक सिद्धी अगवाल, स्पृहा भोदे, प्रांजल भालेराव यांनी साथ दिली. हार्मोनियम वादक प्रणव देशपांडे, तबलावादक सुरज शिंदे, तालवाद्य उर्वी भावे, निवेदक डॉ. वंदना लवांडे आदींनी साथसंगत दिली.

श्री स्वामी समर्थ मंदिराच्यावतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यासाठी जनकल्याण रक्तपेढी ने सहकार्य केले. स्वामी भक्तांनी दत्त जयंती निमित्त स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. सध्या रक्ताचा तुटवडा असल्याने रक्ताची किती गरज आहे. हे स्वामी भक्तांनी जाणून रक्तदान केले. भाविकांना केलेले आवाहन फल रूपात आले. असे डॉ. वसंत झेंडे यांनी सांगितले.

या शिबिरासाठी पारिचारीका सोनाली खांडरे, सुलभा पवार, मेघा शिंदे, प्रीती चिपाडे, मोहन शर्मा आदींनी परिश्रम घेतले.

श्रीदत्त जन्मोत्सवाची सांगता दत्तयाग, महाआरती व महाप्रसादाने करण्यात आली. रविवारी दुपारी ॲड. श्री. व सौ.जयदीप देशपांडे यांचं हस्ते श्री.स्वामी समर्थ महाराजांची आरती करण्यात आली. या महाआरतीला भाविक उपस्थित होते. महाआरतीनंतर महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला.

यावेळी श्री. स्वामी समर्थ मंदिर ट्रस्ट, सदस्य, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊन हा उत्सव पार पाडला.


## बाळ आजारी आहे का?



- ते वारंवार आजारी असणे
- नेहमी सर्दी, खोकला
- वारंवार होणारा बाल दमा
- वारंवार जुलाब होणे
- प्रतिकारशक्ती कमी असणे
- वजन, उंची कमी

या तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर

*सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.

*सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

संपर्क : मो. ९५१११९०४४४

डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds

अक्षय मुलांचे हॉस्पिटल बालिकाश्रम रोड, अ.नगर



आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधांयुक्त

## इंडो आयरिश हॉस्पिटल

आयोजित

हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा

## मोफत सर्व रोग तपासणी शिबीर

दि. २५ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ वा. (रविवार सोडुन)

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री सहाय्यता निधी

* मोफत ॲन्जीओप्लास्टी
* माफत डायलेसीस/किडनी विकार
* माफत कर्करोग शस्त्रक्रिया
* मोफत नवजात अतिदक्षता विभाग
* मोफत अपघात व पॉली ट्रॉमा फ्रॅक्चर

सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध | मोफत साखर तपासणी | २४ तास अत्यावश्यक व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध | ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत

सोनेग्राफी, एक्स-रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंधत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत

* शिबीरस्थळ *

इंडो आयरिश हॉस्पिटल

तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर.

फोन : 0241-2423336,

मो. 9130423336, 9860310001

टिप : नांव नोंदणी आवश्यक

मोफत ओ.पी.डी.


# राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार कृष्णकांत लोणे यांना जाहीर



नगर – नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कारांची घोषणा राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे यांनी केली असून यात केडगाव येथील कृष्णकांत गणपत लोणे यांच्या सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेवून त्यांना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हा राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभ ५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २.३० वा. रोटरी क्लब सभागृह, गंजमाळ शालिमार जवळ, नाशिक येथे संपन्न होणार आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा यावेळी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.



अभिनेत्री अमृता राव यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी संस्थेच्या बाणेर सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी डॉ त्रिवेणी व १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांना भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी अमृता राव यांच्या हस्ते इंडिया एक्सीलेंस अ‍ॅवॉर्ड्स २०२४ प्रदान करण्यात आला. यावेळी बी के डॉ. महादेव भाई व बी के रामू भाई उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकी व वहिवाटीची असून त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान सदर मिळकतीचे विक्रीबाबत बोलणी होऊन मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलाकडून विसारादाखल रक्कम स्वीकारून सदर मिळकत आमचे अशिलास खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार लवकरच होणार आहे. सदर मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र, मदार, मनाई हुकुम, स्थगिती, पोटगी, चार्ज, दावा, कोर्ट कारवाई, बँक बोजा, अव्वल जप्ती, भाडेकरार, अन्न, वस्त्र, लीज इ. कोणत्याही प्रकारचा कसलाही मालकी हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन **७ दिवसांचे** आत लेखी स्वरुपात कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहमदनगर, पोट तुकडी ता. नगर पैकी, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मे. दुय्यम निबंधक साहेब अहमदनगर यांचे कक्षेतील **मौजे चाहुराणा खुर्द** येथील **प्लॉट** मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| २०/२अ२/२०/३ व २१/१ व २/१ व ३ | ९ ते ११ / १ व १ / प्लॉट नं. ५ | २९२.६५ चौ.मी. |

ही संपुर्ण मिळकत.

**यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :**

**पुर्वेस :** प्लॉट नं. ८ **दक्षिणेस :** प्लॉट नं. ६ **पश्चिमेस :** ६ मी. रुंदीचा रस्ता **उत्तरेस :** प्लॉट नं. ४

सदर मिळकतीचे विद्यमान मालकः **सौ. उज्वला अनिल गांधी,** रा. रामदास पेठ, नागपुर. जि. नागपुर,

**ॲड. राहुल दिलीप कुलकर्णी ॲड. निकिता उमेश पोळ ॲड. गीता संदीप लोढा**

पत्ता: आनंद हाइटस् बिल्डिंग, कौटुंबिक न्यायालयासमोर, अहमदनगर. मो.नं. ९४०३७८१३६९

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेला प्लॉट मिळकत विद्यमान मालक **रेखा कानीफ धस** रा. वैष्णवी नगर, रेणुका माता मंदिर, केडगाव अहमदनगर. यांचे मालकी वहिवाटीचा आहे. सदर प्लॉट मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन विसारापोटी आमचे अशिलाकडुन रक्कम देखील स्वीकारलेली आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **५ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा तुकडी अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **केडगांव** येथील बिगरशेती प्लॉटचे वर्णन खालील प्रमाणे.

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| २४/२५/१/२५/२ | १३९ | १८६.०० चौ.मी. |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचा उत्तर – पुर्व बाजुचा प्लॉट त्याचे क्षेत्र ४६.५० चौ.मी. प्लॉट बाबत.

**यासी चतु:सिमा खालील प्रमाणे** –

पुर्वेस – ओपन स्पेस दक्षिणेस – प्लॉट नं.१३९ पैकी

पश्चिमेस – प्लॉट नं.१३९ पैकी उत्तरेस – अंतर्गत रोड

दि. १६/१२/२०२४

अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**

**ॲड. कुरेशी फैजान फारुक**

जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर

मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबद्दल विद्यमान मालक यांनी विक्रीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरविलेला आहे सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक वित्तीय संस्था अगर सोसायटीचा कर्ज बोजा नाही जामिन तारण नाही तसेच सदर मिळकतीबाबत भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली.

**मिळकत वर्णन:**

जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील शहर नगर येथील सर्जेपुरा भागातील (१) सिटी सर्व्हे नं. ७३७६ यांचे एकुण क्षेत्र ५२८.१० चौ.मी (२) सिटी सर्व्हे नं. ६३५३ यांचे एकुण क्षेत्र ७१.९० चौ.मी यांसी एकत्रित चतु:सीमा– पूर्वेस : सिटी सर्व्हे नं. ७३७७, दक्षिणेस : लागु रस्ता, पश्चिमेस : लागु रस्ता, उत्तरेस : सिटी सर्व्हे नं. – ७३७४

**विद्यमान मालक** – १ अ. **श्री. बाबासाहेब सोन्याबापु वाकळे** रा. गणेश चौक, सावेडी, अहमदनगर १ब : **श्री. संजय सुरेश ढोणे** रा. साई मंदिर जवळ, लोणार गल्ली, अहमदनगर १ ब : **इम्रान अयाज शेख** रा. मारुती मंदिरजवळ, गोकुळवाडी, सर्जेपुरा, अहमदनगर २. **श्री हरीष मुकुंदलाल ॲबट** रा. ॲबट बंगला, औरंगाबाद रोड, अहमदनगर

अहिल्यानगर

दिनांक :– १६/१२/२०२४

**ॲड. उषा राजाराम जगदाळे (पटेल)**

पत्ता – हऊ श्री बंगलो, आदर्श कॉलनी, एच डी एफ सी बँक जवळ, प्रोफेसर चौक, सावेडी, अहमदनगर मो नं. ८८८८८८८१९९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठे करार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १६/१२/२०२४.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी व तालुका नगरपैकी, अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील **मौजे चाहुराणा बुद्रुक येथील** मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

**सर्व्हे नंबर ७५ मधील प्लॉट नंबर ६५ चे एकुण क्षेत्र २८५.०० चौ.मीटर हा विद्यमान मालक यांच्या मालकीचा संपूर्ण प्लॉट मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – प्लॉट नं. ६८ दक्षिणेस – प्लॉट नं. ६६

पश्चिमेस – रस्ता उत्तरेस – प्लॉट नं. ६४

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक** –

**१. कल्पना राजेंद्र दमानी**

**२. रोहित राजेंद्र दमानी**

**३. प्रेरणा निखील कुलकर्णी**

**४. नरेंद्र देवकिसन दमाणी**

सर्व रा. शिवाजीनगर, पुणे.

**ॲड. समीर वखारे**

पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.

मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **नंदा ईश्वरलाल लांडे रा. सिव्हिल हाडको कॉलनी, शास्त्री चौक, सावेडी, अहमदनगर.** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर प्लॉट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे कर्ज नाही. सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा **साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ. नगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. ३११/२/३ मधील प्लॉट नं. १७ याचे एकुण क्षेत्रफळ ११५.५० चौ. मी. ही संपूर्ण प्लॉट मिळकत.**

**यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :-**

पुर्वेस –९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस – प्लॉट नं. १६,

पश्चिमेस – प्लॉट नं. १, उत्तरेस – प्लॉट नं. १८,

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर

दिनांक :– १६/१२/२०२४

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**

**ॲड. ओंकार पंडीत मोरे**

मो नं. ९८६०६४६४६३,

ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर

# अर्थजगत

**नोकरदारवर्ग वेतनावाढीचा पैसा कोठे गुंतवावा यावरून नेहमीच द्विधा मनस्थितीत असतात. गृहकर्जाचे लवकर रिपेमेंट करावे की, गुंतवणूक वाढवावी यावरून विचारांत पडलेले असतात. दोन्हीचे फायदे आणि नुकसान आहे. नोकरदाराचे वेतन, आर्थिक स्थिती, जबाबदारी, आर्थिक ध्येय यावर पर्याय निवडता येऊ शकतो. आपल्यासमोर नेहमीच डेट आणि वेल्थ क्रिएशनपैकी एकाची निवड करण्याचे आव्हान असते. एकीकडे गृहकर्जाचा हप्ता असतो तर दुसरीकडे गुंतवणूक वाढविण्याचे आव्हान असते. अनेकदा यावर लोक निर्णय घेऊ शकत नाहीत. अतिरिक्त उत्पन्नाचा वापर हा नवीन गुंतवणुकीसाठी करायला हवा की अधिक हप्ता भरून गृहकर्ज लवकर संपविले पाहिजे, यावर मतैक्य होत नाही. स्वाती नावाची नोकरदार महिला ही अशाच प्रकारच्या विचारांत अडकली आहे. तिची आर्थिक स्थिती पाहू.**

## वेतन वाढले? एसआयपी की रिपेमेंट?

स्वाती नावाच्या एका महिलेने एक कोटीचे गृहकर्ज घेतले आहे. तिचा मासिक हप्ता ८६ हजार रुपये आहे. हे कर्ज वीस वर्षांसाठी आहे. स्वाती ही आयटी कंपनीत असून तिला कंपनीकडून वेतनात वार्षिक २४ हजार रुपयांची वेतनवाढ मिळते. आता स्वाती या वेतनवाढीच्या पैशाचे काय करावे, यावर ती निष्कर्षाप्रत पोचत नाही. गृहकर्ज कमी करावे की गुंतवणूकीची पद्धत बदलावी, यावर ती निर्णय घेऊ शकत नाही. या प्रकारचा प्रश्न केवळ स्वातीपुरतीच नाही तर अनेकांसमोर आहे.

**तज्ज्ञांच्या मते,** या प्रश्नांचे उत्तर पाहण्यासाठी तिच्या दीर्घकाळाच्या आर्थिक नियोजनाचे आकलन करावे लागेल. अर्थात वेळेच्या अगोदर गृहकर्ज फेडण्याचे अनेक फायदे आहेत. याप्रमाणे योग्य ठिकाणी गुंतवणूक केल्यास दीर्घकाळात चांगला फंड तयार होऊ शकतो. त्यामुळे दोन्ही पर्यायावर विचार केला पाहिजे. कोणता पर्याय चांगला राहू शकतो, ते पाहू,

हप्ता ८६ हजारावरून एक लाख १० हजार केल्याने गृहकर्जाचा कालावधी बराच कमी होऊ शकतो. तो वीस वर्षांवरून १३.७ वर्षे राहू शकते आणि त्यामुळे कर्जाच्या व्याजापोटी जाणारे सुमारे ३५ लाख रुपये वाचतात. ही मोठी बचत आहे. त्याचबरोबर आपल्या कर्जाची जबबादारी देखील कमी होते. परंतु त्याचे नुकसान म्हणजे आपण दीर्घकाळाच्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या जादा परताव्याचा लाभापासून वंचित राहतो. दुसरा पर्याय म्हणजे स्वातीने ८६ हजार रुपयाचा हप्ता कायम ठेवला. तीने वेतनवाढीचे पैसे एसआयपीमध्ये गुंतवले. त्यावर तिला वार्षिक सहजपणे १२ टक्के परतावा मिळाला. १७ वर्षात ती गुंतवणूक वाढवत १.६ कोटी रुपये झाली. हे अतिरिक्त वेतन तिला आर्थिक ध्येय पूर्ण करण्यासाठी फायदेशीर राहू शकते. जर तिने हा पैसा शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास तिला अधिक




परतावा मिळू शकतो. गृहकर्जाच्या रिपेमेंटमुळे जबाबदारी कमी होत असल्याने स्वातीला मानसिक समाधान राहू शकते. दुसरीकडे एसआयपीतील गुंतवणूक केल्याने दीर्घकाळात मोठा फंड तयार होतो. म्हणून या गोष्टींचे आकलन करून तुम्हाला निर्णय घ्यायचा आहे. आणखी काही मुद्यावर विचार करायला हवा.

कर आकारणी: स्वातीने गृहकर्जाच्या मुद्दलात पैसे भरल्याने वार्षिक दीड लाख रुपये आणि व्याज रिपेमेंटवर वार्षिक दोन लाख रुपयाच्या डिडक्शनवर दावा करू शकते. त्यामुळे कर्जाचा खर्च हा बराच कमी होऊ शकतो. म्हणून वेतनवाढीचा पैसा हा गुंतवणूक केल्यास अधिक फायद्याचा राहू शकतो.

**लिक्विडीटी:** एसआयपीच्या माध्यमातून स्वातीकडे नेहमीच मोठी रक्कम हाताशी राहिल. कर्जफेडीचा पैसा लॉक होतो. हप्ता वाढीचा लाभ हा जेव्हा कर्ज संपल्यावरच मिळेल. तत्पूर्वी तिला वेतनवाढीचा कोणताही फायदा मिळणार नाही,

**जोखीम विरुद्ध बक्षीस**

एसआयपीच्या माध्यमातून गुंतवणुकीवर किमान दहा ते बारा टक्के परतावा मिळतो आणि हा परतावा गृहकर्जाच्या ८.५ टक्के व्याजापेक्षा अधिक आहे. मात्र एसआयपीत गुंतवणूक करताना जोखीम देखील असते, हे लक्षात घेतले पाहिजे. तज्ज्ञांच्या मते, दोन्ही पर्यायापैकी कोणता पर्याय फायदेशीर आहे, हे तुमचे आर्थिक नियोजन आणि पार्श्वभूमीवर अवलंबून असेल. तुम्ही आर्थिक ध्येय गाठण्याच्या अगोदरच पुरेशा प्रमाणात गुंतवणूक करत असेल तर गृहकर्जाचे रिपेमेंट करून हप्ता वाढवू शकतो. तुम्ही आर्थिक ध्येय गाठण्यासाठी पुरेशी गुंतवणूक करत नसाल तर तुम्ही बढतीचा पैसा हा एसआयपीच्या मार्गाने गुंतवणूकसाठी वापरू शकता.

## तेजीचा कल कायम राहील?

■ शेअर बाजार

भारतीय शेअर बाजारात गेल्या आठवड्यामध्ये सुरुवातीची चार सत्रे चाललेला कारभार हा एका छोट्या रेंजमध्ये सुरू होता. निफ्टी-५० चा विचार केल्यास २४५०० ते २४७०० या २०० अंकांच्या दरम्यान हा निर्देशांक घुटमळताना दिसला. शुक्रवारच्या दिवशी झालेल्या तीव्र घुसळणीदरम्यान निफ्टी-५० मध्ये २४१८० पर्यंत जोरदार घसरण झाली; पण या स्तरावरुन झालेल्या तुफान खरेदीमुळे थेट चार दिवसांची रेंज मोडून काढत निफ्टी २४८०० समीप पोहोचला. धातू क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागांमधील जोरदार विक्रीमुळे सेन्सेक्सही शुक्रवारी १२०७ अंकांनी घसरला होता. परंतु खरेदीच्या जोरामुळे खालील पातळीवरुन २००० अंकांनी वरच्या दिशेला झेपावला. भारती एअरटेल, आयसीआयसीआय, एचडीएफसी बँकेच्या समभागांमधील तेजी बाजारासाठी बूस्टर ठरली. दिवसाखेरीस सेन्सेक्समध्ये ८४३ अंकांची वाढ झाली आणि तो ८२,१३३ अंकांवर बंद झाला; तर निफ्टीमध्ये २२० अंकांची वाढ झाली आणि तो २४,७६८ अंकांवर बंद झाला. गतसप्ताहात या दोन्ही निर्देशांकांमध्ये अनुक्रमे ०.५ टक्के आणि ०.३७ टक्क्यांची तेजी दिसून आली आहे. यादरम्यान मुंबई शेअर बाजारात नोंदणीकृत असणाऱ्या कंपन्यांचे एकूणबाजार भांडवल १.३ लाख कोटींनी वधारुन ४५९.४ लाख कोटींवर पोहोचले आहे.

सलग चौथ्या आठवड्यात बाजाराने चढती भाजणी दाखवत गुंतवणूकदारांना दिलासा दिला आहे. या तेजीचे एक कारण म्हणजे नोव्हेंबर महिन्यामध्ये देशातील किरकोळ



महागाईच्या दरात झालेली घसरण. ऑक्टोबर महिन्यामध्ये ६.०२ टक्क्यांवर गेलेला किरकोळ महागाईचा दर नोव्हेंबर महिन्यात घसरून ५.४८ टक्क्यांवर आला आहे. ऑक्टोबरमध्ये अन्नधान्यांच्या किमतींमध्ये झालेल्या वाढीमुळे चलनवाढीच्या दराने अचानक उचल खाल्ली होती. याचा परिणाम म्हणजे गेल्या द्वैमासिक पतधोरणात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने सलग ११ व्यांदा रेपोदर जैसे थे ठेवण्याचे धोरण स्वीकारले. तथापि, आता महागाईचा निर्देशांक उताराकडे सरकू लागल्याने फेब्रुवारी महिन्यामध्ये होणाऱ्या पतधोरण बैठकीत आरबीआयचे नवे गव्हर्नर संजय मल्होत्रा व्याजदर कपातीचे गिफ्ट देण्याच्या शक्यता वाढल्या आहेत.

दुसरीकडे, जागतिक पातळीवरील स्थिती पाहिल्यास गेल्या आठवड्यात कच्च्या तेलाच्या किमती घसरत चाललेल्या असताना सप्ताहाखेरीस पुन्हा वधारल्या आहेत. नैसर्गिक वायू, सोने, चांदी यांच्या दरांनीही जोरदार उचल खाल्ली आहे. चीनच्या अर्थव्यवस्थेसंदर्भातील सकारात्मक बातम्यांमुळे कमोडिटी बाजारात तेजी दिसून आली असली तरी चीनकडून जगापुढे मांडली जाणारी माहिती संशयास्पद असल्याचे मत काही संस्थांनी व्यक्त केले आहे. याबाबतचे सत्य समोर आल्यास कमोडिटी बाजारात मोठी घसरण येऊ शकते. २०२५ हे वर्ष जगभराबरोबर भारतीय शेअर बाजारासाठीही उलथापालथींचे राहू शकते. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेची वधारलेली क्षमता शेअर बाजारासाठी नवीन वर्ष दमदार परतावा देणारे राहील, असा बहुतांश विश्लेषकांचा अंदाज आहे.


चालू आठवड्याचा विचार करता शुक्रवारी गिफ्ट निफ्टी १०० अंकांची घसरण दर्शवत बंद झाल्याने सोमवारची भारतीय बाजाराची सुरुवात घसरणीने होण्याची शक्यता आहे. सेबीने अल्गो ट्रेडिंगसंदर्भात एक नियमावली जाहीर केली आहे. त्याचेही पडसाद बाजारात उमटू शकतात. टेक्निकल चार्ट पाहिल्यास निफ्टीसाठी २४७०० च्या स्तरावर सर्वांत पहिली आधारपातळी आहे. त्यानंतर २४५००-२४४०० च्या पातळीवर भक्कम आधार आहे. तो तुटल्यास शुक्रवारची नीचांकी पातळी म्हणजे २४२०० वर आधार आहे. त्याखालच्या पातळीवर निफ्टी बंद झाल्यास सध्याचा तेजीचा ट्रेंड बदलला असे म्हणता येईल. तोवर 'बाय ऑन डिप्स' ही रणनीती प्रभावी ठरू शकते. वरच्या पातळीवर २५,२०० च्या पातळीवर अडथळा पातळी आहे. त्याच्या वरती निफ्टी बंद झाल्यास २५५००-२६००० च्या दिशेने झेपावण्यास तो तयार होईल.

पुढील आठवड्यात समभागांची खरेदी करताना बाजाराचा कल पाहणे गरजेचे राहील. आरोग्य क्षेत्रातील काही कंपन्यांमध्ये सध्या चांगली खरेदी दिसत आहे. त्यादृष्टीने ७१५ रुपयांवर असणारा फोर्टिस हेल्थकेअरचा समभाग ८००-८६० रुपयांचे लक्ष्य ठेवून मध्यमकालीन गुंतवणुकीसाठी खरेदी करता येईल. अशाच प्रकारे एचसीजीचा समभाग ५०४ रुपयांवर असून ५७५ रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. २०२४ मध्ये सरकारी बँकांच्या समभागांची कामगिरी दमदार राहिली असली तरी २०२५ मध्ये ती मर्यादित राहील असा अंदाज अनेक विश्लेषक व्यक्त करत आहेत. त्यामुळे या समभागांमध्ये उच्चांकी पातळीवर खरेदी करणे टाळणे योग्य राहील.

बाजाराचा एकंदरीत कल तेजीचा दिसत असला तरी चढउतारांमुळे वाढलेली जोखीम लक्षात घेता संयमाने आणि स्टॉपलॉस टूलचा वापर करत आपापल्या जोखीमक्षमतेनुसार गुंतवणूक करावी. ट्रेडिंग करणारे बहुतांश जण पैसा गमावतात असे सेबीच्या अहवालात दिसून आले आहे. हे लक्षात घेता आपल्या एकूण भांडवलापैकी ५ ते १० टक्के रक्कमच ट्रेडिंगसाठी वापरावी. उर्वरीत भांडवल मध्यम व दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी वापरून चांगल्या कंपन्यांच्या समभागांची खरेदी करावी. ती निश्चितपणाने चक्रवाढ पद्धतीने वाढते, असे आजवरचा इतिहास सांगतो. त्यामुळे शेअर बाजारात ट्रेडर्स म्हणून येण्यापेक्षा गुंतवणूकदार बनून येणे फायद्याचे आहे.

## वाढत्या प्रदूषणकाळात आरोग्यविमा गरजेचा

राजधानी नवी दिल्लीसह मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांत देखील प्रदूषणाची पातळी वाढताना दिसत आहे. परिणामी प्रदूषणामुळे आजारी पडणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यावरील उपचारापोटी रुग्णांच्या नातेवाईकांना, रुग्णांच्या कुटुंबीयांना खिसा रिकामा करावा लागत आहे. यामुळे मासिक आर्थिक गणित बिघडू नये यासाठी सर्वंकष आरोग्य विमा योजना



आवश्यक आहे. याप्रमाणे अचानक उद्भवलेल्या आजारपणाचा मुकाबला करण्याबरोबरच आर्थिक आधारही मिळेल.

प्रदूषणामुळे अस्थमा, ब्रोकायटिंस, क्रॉनिक ऑब्सट्रक्टिव्ह आणि पल्मोनरी डिसीज तसेच निमोनियासारखे आजार होऊ शकतात. यावर बराच खर्च करावा लागतो. म्हणूनच चांगली मल्टीकव्हर हेल्थ इन्शूरन्स पॉलिसी असणे अत्यंत गरजेचे आहे.

● **विमा पॉलिसीत प्रदूषणाला कवच** : देशात उपलब्ध असणाऱ्या बहुतांश स्टॅंडर्ड विमा पॉलिसी या प्रदूषणापासून होणाऱ्या आजारपणाला कवच देण्याचे काम करतात. सीओपीडी किंवा अस्थमासारख्या श्वसनविकारासंबंधी आजारपण उद्भवल्यास रुग्णालयात दाखल होण्याची वेळ येते तेव्हा या विमा योजना रुग्णांचे संरक्षण करतात. काहीवेळा रुग्णांना आयसीयूमध्ये देखील राहण्याची वेळ येते. अशावेळी हेल्थ इन्शूरन्स पॉलिसी अत्यंत उपयोगी राहू शकते. आयसीयू किंवा गंभीर स्थितीत रुग्णांची देखभाल करणे गरजेचे राहते आणि अशावेळी आरोग्यविमा महत्त्वाचा ठरतो.

● **ओपीडी कवचही असावे** : तुम्ही विमा पॉलिसी खरेदी करत असाल तर पॉलिसीत ओपीडी कवचचा देखील समावेश करावा. प्रदूषणासंबंधित आजारपणासाठी सतत डॉक्टरांच्या संपर्कात राहावे लागते. शेवटी प्रत्येकवेळी शंभर ते दीड हजार रुपयेपर्यंत फीस देणे शक्य राहत नाही. पण विमा पॉलिसीत ओपीडी कवच सामील केल्याने वारंवार शुल्क देण्याची गरज भासणार नाही. अर्थात काही दवाखान्यात दहा दिवसांच्या आत पुन्हा जाण्याची वेळ येते तेव्हा रुग्णाकडून शुल्क घेतले जात नाही. पण सर्वत्र असा अनुभव येत नाही.

● **पॅथोलॉजी कवचही गरजेचे** : ओपीडीप्रमाणेच विमा पॉलिसीत पॅथोलॉजीतील चाचणीला किंवा निदानाला कवच असणे आवश्यक आहे. प्रदूषणासंबंधी आजारपणाचा मुकाबला करण्यासाठी विविध तपासण्या कराव्या लागतात आणि त्याचा खर्चही बऱ्यापैकी असतो. मात्र हेल्थ इन्शूरन्स पॉलिसीत पॅथोलिजी किंवा डायग्नोस्टिक कवच असेल तर बऱ्यापैकी उपचाराचा खर्च हा कमी करता येऊ शकतो.

● **'सीआय' कवच आवश्यक** : हेल्थ इन्शूरन्स पॉलिसी खरेदी करताना क्रिटिकल इलनेस अर्थात सीआय कवच असावे. हे कवच पॉलिसीधारकास प्रदूषणामुळे होणाऱ्या फुफ्फुसाच्या गंभीर आजारावर उपचारापोटी येणाऱ्या खर्चाला कवच प्रदान करते. शिवाय कर्करोग आणि हृदयरोगाशी संबंधित अन्य गुंतागुंतीच्या उपचारासाठी क्रिटीकल इलनेस कवच उपयुक्त ठरते. फुफ्फुसाचा कर्करोग किंवा हृदयाशी संबंधित आजारांवरचा खर्च हा साधारणपणे २५ ते ३० लाख रुपयांपर्यंत पोचू शकतो. त्यामुळे क्रिटीकल इलनेस कवच असणे गरजेचे आहे.

**विम्यासाठी जादा हप्ता**


अर्थात याप्रकारची विमा पॉलिसी महाग राहू शकते. मात्र उपचारापोटी येणाऱ्या खर्चाच्या तुलनेत हप्त्यापोटी येणारा पॉलिसीवरचा खर्च हा कमीच राहू शकतो.

## रेंट क्रेडिट स्कोर म्हणजे काय?

क्रेडिट रेटिंग देणाऱ्या कंपन्या किंवा संस्था या सध्या घरभाड्याला क्रेडिट इन्फॉरमेशन एजन्सी क्रेडिट स्कोरमध्ये सामील करत नाहीत. पण नियमित रुपाने भाडे भरल्यास आपला क्रेडिट स्कोर चांगला होऊ शकतो आणि यासाठी 'रेंटनपे' एक पर्याय आहे. त्याचे नाव रेंट क्रेडिट स्कोर असे आहे. कंपनीच्या मते हा मार्ग लोकांच्या अनेक अडचणींवर मार्ग काढू शकतो.

'रेटेंनपे' ने लोकांचा क्रेडिट स्कोर वाढविण्यासाठी एक मार्ग काढला आहे. रेट क्रेडिट स्कोर तयार करण्यासाठी भाडेकरूंना आपले भाडे रेसिडेंस कार्ड मार्फत (आर-कार्ड) भरावे लगेल. हे 'रेटेंन-पे'चे पेमेंट टूल आहे. 'रेटेन-पे'चे संस्थापक सारिक शेट्टी म्हणतात, रेटेन-पे ॲप हे रेंट कंट्रोल ऑफ इंडियातंर्गत आहे. रेंटेनपे ही एक डेटा कंपनी असून ती आरबीआयच्या डिजिटल अणि 'लेडिंग लॉ' चे पालन करते.

**रेंट पेमेंट्सवर रिवॉर्ड मिळेल :** या सेवेचा लाभ घेण्यासाठी नोंदणीकृत रेंट ॲग्रीमेंट आवश्यक आहे. ॲपकडून बँक गाइडलाइन्सचे पालन करण्याबरोबरच पेमेंट गेट वे आणि आरबीआयच्या नियमांकडे लक्ष दिले जाते. त्यामुळे या सेवेचा वापर करण्यासाठी भाडेकरार पत्र आवश्यक आहे. शेट्टी यांनी म्हटले, आम्ही ही सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कायदेशीर शक्यता पडताळून पाहिल्या आहेत. वेळेवर रेंट पेमेंट केल्यानंतर तुम्ही केवळ स्ट्रॉंग रेंट हिस्ट्री तयार होत नाहीत तर सर्वंकष रेंट क्रेडिट स्कोर देखील वाढेल. ही बाब सर्व प्रकारच्या रेंटल इन्फॉरमेशच्या डिजिटल स्टोरेजचे सोल्यूशन असेल.




रेंट पेमेंट्सवर तुम्हाला रिवॉर्डही मिळेल. म्हणजे भाड्याचे घर बदलले तरी नवा घरमालक या पेमेंट हिस्ट्रीवरून तुमची विश्वासर्हता पडताळून पाहू शकतो. यासाठी ओळख सांगण्याची गरज नाही.


**६५० पेक्षा कमी रेंट स्कोर हा खराबच :** भाड्याच्या घरात राहणारा कोणताही व्यक्ती रेनटेनपेच्या ॲपच्या मार्फत नियमित भाडे भरत असेल तर आणि रेंट स्कोअर चांगला राहत असेल तर त्याचे एक महिन्याचे भाडे रेंटेन पे भरेल. घरमालक या ॲपला डाउनलोड करत असेल आणि ते स्वत: खाते तयार करत असतील तर त्यांना भाडेकरूच्या प्रोफाईलचा ॲक्सेस दिला जाईल. अर्थात ही माहिती रेंटेनपेने पडताळून पाहिलेली असते. कंपनीच्या मते, ६५० पेक्षा कमी रेंट क्रेडिट स्कोर असेल तर तो खराब मानला जाईल. ७९० पेक्षा अधिक स्कोर हा सर्वात चांगला मानला जातो.

## पीएफ क्लेमबाबत नियमबदल

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने प्रॉव्हिडंट फंड क्लेमच्या नियमांमध्ये बदल केला आहे. आता पीएफचा दावा करण्यासाठी आधार अनिवार्य असणार नाहीये. परंतु हे सर्व कर्मचाऱ्यांसाठी नाही, तर काही विशेष श्रेणीतील सदस्यांसाठी आहे. या शिथिलीकरणामुळे काही श्रेणीतील कर्मचाऱ्यांसाठी युनिव्हर्सल अकाउंट नंबर आधारशी जोडण्याच्या नियमात सूट देण्यात आली आहे. ज्या कर्मचाऱ्यांसाठी आधार मिळणे कठीण काम आहे किंवा दुसऱ्या शब्दांत त्यांना आधारसारखी कागदपत्रे मिळू शकत नाहीत अशा कर्मचाऱ्यांसाठी हे पाऊल सोपे होणार आहे.

ईपीएफएमपी कायद्यांतर्गत समाविष्ट असलेल्या भारताबाहेर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठीही आधार अनिवार्य करण्यात आलेला नाही. या बदलाच्या अंमलबजावणीसह, ते कर्मचारी देखील दावा करू शकतात. यासाठी वेगळा पर्याय ठेवण्यात येणार आहे.

कर्मचाऱ्यांच्या या श्रेणींसाठी ईपीएफओने इतर कागदपत्रांद्वारे पीएफ दावे निकाली काढण्याची परवानगी दिली आहे. यामध्ये पासपोर्ट, नागरिकत्व प्रमाणपत्र किंवा इतर अधिकृत आयडी पुरावा या पडताळणी दस्तऐवजांचा समावेश आहे. पॅन, बँक खाते तपशील आणि इतर पात्रता निकषांद्वारे त्यांची पडताळणी केली जाईल.



■ जाणून घ्या

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेअंतर्गत नोंदणीकृत आंतरराष्ट्रीय कर्मचाऱ्यांना याअंतर्गत सूट देण्यात आली आहे.

जे कर्मचारी भारतात काम करून आपल्या देशात गेले आणि त्यांना आधार मिळू शकला नाही.

परदेशी नागरिकत्व असलेले भारतीय, ज्यांना आधार मिळू शकला नाही कायमस्वरूपी परदेशात गेलेले माजी भारतीय नागरिक आणि नेपाळ आणि भूतानच्या नागरिकांनाही या अंतर्गत सूट देण्यात आली आहे. त्याच वेळी,

ईपीएफओच्या नियमतानुसार, अधिकाऱ्यांनी कोणत्याही दाव्याची काळजीपूर्वक चौकशी करावी. यानंतर, अप्रूव्हल ऑफिसर-इन-चार्जमार्फत ई-ऑफिस फाइलद्वारे मंजुरी आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांना तोच युएएन क्रमांक कायम ठेवण्याचा किंवा मागील सेवा नोंदी त्याच युएएन क्रमांकावर हस्तांतरित करण्याचा सल्ला दिला जातो. त्यामुळे दावे मिळवणे सोपे होते.


## 'एफसीएनआर' खात्यातील गुंतवणूक : सुरक्षित पर्याय

बळवंत जैन, प्रख्यात अर्थतज्ज्ञ

भारत आणि अमेरिका यांच्यातील महागाई दरात फरक असल्याने भारतीय रुपयांचे मूल्य अमेरिकी डॉलरच्या तुलनेत सातत्याने कमी होत आहे. भारतीय रुपया हा दीर्घकाळापासून घसरत असल्याने रुपयांच्या तुलनेत परकी चलनातील गुंतवणूक ही सामान्यपणे जादा परतावा देत आहे. रिअल इस्टेट आणि भारतीय इक्विटीव्यतिरिक्त 'एनसीएनआर'मधील गुंतवणूकही अनिवासी भारतीयांसाठी एक चांगला आणि सुरक्षित पर्याय आहे. फेमा (परकी चलन व्यवस्थापन अधिनियम) कायदा हा अनिवासी भारतीयांना काही परकी चलनातील खाते बाळगण्यास परवानगी देते. यास एफसीएनआर (फॉरेन करन्सी एक्चेंज नॉन रेसिडेंट) खाते म्हटले जाते. 'एफसीएनआर' खात्याविषयी जाणून घेऊ.

**खात्याची मूळ वैशिष्टे**

सोप्या शब्दांत सांगायचे झाल्यास, एनसीएनआर हे अनिवासी भारतीय खात्यातील पोटप्रकार आहे. एनफसीएनआर खाते केवळ मुदत ठेवीच्या रुपातूनच सुरू करता येते. तुम्ही चालू खाते किंवा बचत खात्याच्या रुपातून एफसीएनआर खाते सुरू करू शकत नाहीत. एफसीएनआर खाते काही परकी चलनातच सुरू करता येते आणि ते भारतीय चलनात संपूर्णपणे एक्स्चेंज होऊ शकते. परकी चलनात सिंगापूर डॉलर, ऑस्ट्रेलिया डॉलर, अमेरिकी डॉलर, स्टर्लिंग पौंड, कॅनडा, डॉलर, जपानचा येन आदी परकी चलनाचा समावेश आहे. हे खाते एक वर्षांपासून ते पाच वर्षाच्या कालावधीसाठी सुरू करता येते. तसेच मुदतपूर्व पैसे काढले तर मिळणाऱ्या व्याजात कपात केली जाते आणि हाच तो दंड असतो. तुम्ही एफसीएनआरा खात्यातून पैसे एक वर्षाच्या आत काढले तर या खात्यातील जमा रक्कमेवर कोणतेही व्याज मिळत नाही.




**एफसीएनआर खात्यावर कर्ज**

तुम्ही तुमच्या एफसीएनआर खात्यातील जमा रक्कमेच्या बदल्यात वैक्तिगत किंवा व्यावसायिक गरजासाठी कर्ज घेऊ शकता. परंतु ही कर्जाची रक्कम अन्य ठिकाणी वापरता येणार नाही. जसे शेतजमीन खरेदी किंवा रिअल इस्टेट खरेदीच्या दृष्टीने करू शकत नाही. अर्थात त्या पैशाचा वापर भारतात घर किंवा कोणताही फ्लॅट किंवा घर खरेदीसाठी करता येऊ शकते.

**एफसीएनआर खाते कोण सुरु करू शकते?**

कोणताही भारतीय नागरिक आणि फेमा नियमानुसार अनिवासी असेल त्यास एफसीएनआर खाते सुरु करता येऊ शकते. याशिवाय अनिवासी भारतीय नसेल परंतु तो मूळचा भारतीय असेल तर त्याला एफसीएनआर खाते सुरु करण्याची परवानगी आहे. या दोन्ही श्रेणीत सामूहिक रुपाने फेमानुसार तुम्ही त्याला एनआरआय म्हणू शकता. म्हणजे अमेरिकेच्या मावळत्या उपाध्यक्षा कमला हॅरिस या अनिवासी भारतीय नसल्या तरी त्या मुळच्या भारतीय आहेत. त्यांना एफसीएनआर खाते सुरु करता येते. एफसीएनआर खाते एकल किंवा संयुक्त नावाने देखील करता येते. मात्र संयुक्त खात्याच्या बाबतीत दुसरा भागिदार देखील एनआरआय असणे गरजेचे आहे. तुम्ही स्थानिक नातेवाईक किंवा 'आयदर' ऑर 'सरव्हायवर' या आधारावर संयुक्त खातेधारक होऊ शकता. तुम्ही अन्य बँकेच्या खात्याप्रमाणेच एफसीएनआर खात्याला नॉमिनी करू शकता आणि नॉमिनी अनिवासी भारतीय असणे गरजेचे नाही. एफसीएनआर खाते सुरू करण्यासाठी अनेक पर्याय आहेत.

भारताबाहेरच्या बँकिंग चॅनेलच्या माध्यमातून परकी चलनात पैसे स्थानांतरित करत सुरू करणे किंवा आपल्या एनआरआय खाते किंवा एफसीएनआर खात्याच्या माध्यमातून पैसे ट्रान्सफर करत सुरू करणे किंवा भारताबाहेर परकी चलनातील कोणत्याही बँकेच्या खात्याच्या धनादेशाद्वारे सुरू करता येऊ शकते.

एफसीएनआर खाते सुरू करताना आपल्याला भारतात शारीरिक रुपाने भारतात असणे गरजेचे नाही अनिवासी भारतीय भारतातील कोणत्याही बँकेत कोणत्याही परकी शाखेत जावून खाते सुरू करू शकतो. यासाठी काही मुलभूत गोष्टी पासपोर्ट, परदेशातील कायम पत्ता आदींचे पुरावे द्यावे लागतात.

**व्याजदर आणि विनिमय दर**

एफसीएनआर खात्यासाठी प्रत्येक परकी चलनासाठी व्याजदर वेगवेगळा असतो. एफसीएनआर खात्यावर देण्यात येणारे व्याजदर हे सामान्यपणे भारतीय नागरिकांच्या ठेवीवरील दरापेक्षा कमी असतात परंतु एफसीएनआर खात्यावरील व्याजदर हे साधारणपणे संबंधित देशात ठेवीवर मिळणाऱ्या व्याजाच्या तुलनेत अधिक असतात. परकी चलनात खाते सुरु करत असल्याने तेथे जमा असलेल्या चलनावर भारतीय चलनाच्या विनिमय दराची जोखीम नसते. त्यामुळे या खात्यावर देण्यात येणारे व्याजदर हे त्यांच्या सध्याच्या वास्तव्याच्या देशाच्या तुलनेत अधिक असते. म्हणूनच एफसीएनआर खाते हे अनिवासी भारतीयांना चांगली आणि जोखीम मुक्त गुंतवणूक करण्याचा पर्याय देते. एफसीएनआर खात्यावर मिळणारे व्याज अणि एफसीएनआर खात्यातील मूळ रक्कम ही आरबीआयची परवानगी न घेता पूर्णपणे भारताबाहेर पाठवता येणे शक्य आहे. या खात्यावर मिळणारे व्याज आपल्या एनआरआय किंवा एनआरओ खात्यात जमा करता येते.

एफसीएनआर खात्यावरचे व्याज भारतात पूर्णपणे करमुक्त आहे. परंतु संबंधित देशात ते करपात्र राहू शकते. जेव्हा आपण फेमानुसार रहिवासी होता, त्यावेळीही एफसीएनआर खात्यावरचे व्याज एफसीएनआर खाते परिपक्व होईपर्यंत करमुक्त राहिल. ही मुभा अनिवासी भारतीयांच्या खात्यावर मिळणाऱ्या व्याजावरील कर आकारणीच्या अगदी विरुद्ध आहे. एनआरआय खात्यावरचे व्याज हे फेमा कायद्यानुसार अनिवासी नागरिक होईपर्यंत करमुक्त ठेवले जाते. तसेच फेमा नियमानुसार नागरिक होताच, ते करपात्र होते.

# बांधकाम कामगार व इतर संघटनेचा २० डिसेंबरला थाळी बजाव आंदोलन

### मुलांची शिष्यवृत्ती आणि इतर शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून कामगार वंचित



नगर – आश्वासन देऊनही बांधकाम कामगारांच्या नोंदणी होत नसल्याने, त्यामुळे बांधकाम कामगारांना मुलांची शिष्यवृत्ती आणि इतर शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळत नसल्याने लोकशाही बांधकाम कामगार व इतर कामगार संघटनेच्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा प्रश्न तात्काळ मार्गी न लागल्यास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकर भैलुमे यांनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर २० डिसेंबर रोजी थाळी बजाव आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. बांधकाम कामागारांच्या सदर प्रश्नाकडे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

संघटनेच्या वतीने बांधकाम कामगारांच्या नोंदणीच्या प्रश्नासंदर्भात ७ ऑक्टोबर रोजी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात निवेदन देण्यात आले होते. सात–आठ महिन्यांपूर्वी भरलेले नोंदणी अर्ज अद्यापि मंजूर झालेले नाहीत. त्यामुळे मुलांची स्कॉलरशिपचे अर्ज चार–पाच महिन्यांपासून मंजूर आहेत, परंतु ते बांधकाम कामगारांची नोंदणी होत नसल्याने ते अर्ज मंजूर केले जात नाहीत. रिनिवलची पण परिस्थिती जैसे थे, अशीच आहे. संसार किटचा कॅम्प लावून त्याचा लाभ संघटनेच्या बांधकाम कामगार सभासदांना मिळावा व कर्जत तालुक्याला हॉस्पिटल मंजूर करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

बांधकाम कामगारांच्या नोंदणी प्रश्नी एका महिन्यामध्ये सर्व प्रलंबित अर्ज निकाली काढा म्हणून शासन निर्णय काढण्यात आले आहे, तरीही अजून ते काम प्रलंबित आहेत. बीओसी सेंटर कामगारांना अधिकचे कागदपत्रे मागतात, ते लवकरात लवकर बंद व्हावे. संपूर्ण राज्यांमध्ये कामगारांचा ऑनलाइन फॉर्म भरताना ९० दिवसाचे पेज शॉप ॲक्ट लायसन्स वापरले जात आहे. परंतु नगरमध्ये शॉप ॲक्ट लायसन्सने अर्ज भरले तर ते नामंजूर केले जात आहे. त्यामुळे कामगारांना अडचण येत असून, शॉप ॲक्ट लायसनवर फॉर्म मंजूर करण्याचे निवेदनात म्हटले आहे. या मागणीचे निवेदन संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

## भिंगार पोलीस ठाण्याच्या आवारातच दोन गटांमध्ये शिवीगाळ व धक्काबुक्की

नगर – भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या अदखल पात्र गुन्ह्याच्या चौकशीसाठी बोलावलेल्या दोन गटांच्या व्यक्तींमध्ये पोलिस ठाण्याच्या आवारातच शिवीगाळ होऊन वाद झाले. ही घटना शनिवारी ( दि.१४) दुपारी घडली.

या बाबतची माहिती अशी की सिमरन शुभम टाक, भाग्यश्री वैभव मनोदिया, शुभम प्रदीप टाक, अशीतोष प्रदीप टाक, संगीता प्रदीप टाक, अनिता गोपीचंद राठोड, मीना गांदले (रा. नेहरू कॉलनी, भिंगार) या सर्वांना अदखलपात्र गुन्ह्याच्या चौकशीसाठी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात बोलावण्यात आले होते. मात्र, चौकशी दरम्यान दोन्ही गटांमध्ये वाद विकोपाला जाऊन परस्परांना शिवीगाळ व झटापटी झाली.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद मधुकर लहारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही गटांतील सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अधिक तपास बी. एस. म्हस्के करत आहेत.

## जुन्या वादातून युवकाला लाकडी दांडक्याने मारहाण

नगर – मित्राबरोबर किरकोळ झालेल्या वादाचा मनात राग धरून एकाने शिवीगाळ, दमदाटी करीत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून लाकडी दांडक्याने मारहाण केली. जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना बोल्हेगाव येथील भारत बेकरी समोर रविवारी (दि.१५) सायंकाळी घडली.

याबाबत सोनाली महादेव अडागळे, (वय ४०, रा. उभा मारुती शेजारी, गांधीनगर बोल्हेगाव) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा मुलगा चैतन्य व त्याचा मित्र योगेश गायकवाड (पुर्ण नाव माहिती नाही. रा.निंबळक, ता.नगर ) असे दोघे जण सोबत एकाच गाडीवर त्याचे मित्राचे कामाच्या ठिकाणी जात होते. दि २ नोव्हेंबर २०२४ रोजी याचे त्याचेसोबत किरकोळ कारणावरुन वाद झाले होते. त्याबाबत अडागळे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

रविवारी (दि.१५) सायंकाळी पाच वाजण्याचे सुमाराम अडागळे यांना चैतन्य याच्या मित्राचा फोन आला की चैतन्य याला बोल्हेगाव येथील भारत बेकरी समोर मारहाण झाली आहे.असे सांगितल्याने त्यांनी हॉस्पीटलमध्ये जाऊन पाहिले असता चैतन्य याचे डोक्याला मागच्या बाजुला व दोन्ही पायाच्या नडघ्याला लागलेले होते. त्यास विचारले की काय झाले तेव्हा त्याने सांगितले की दुपारी साडे चार वाजण्याचे भारत बेकरीसमोर योगेश गायकवाड हा दारु पिऊन आला व त्याने त्याला जुन्या वादाचे कारणावरुन शिविगाळ करून लाथाबुक्क्याने मारहाण करुन त्याचे हातातील लाकडी दांडक्याने जखमी केले. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी सोनाली अडागळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन योगेश गायकवाड (पुर्ण नाव माहिती नाही) यांचे विरुध्द मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली.

## महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसका मारून पळविले

### मार्केट यार्ड परिसरातील महात्मा फुले चौकातील घटना, गुन्हा दाखल

नगर – धार्मिक परीक्षा बोर्डावरील आनंदधाम येथे दर्शन घेऊन परतणाऱ्या महिलेचे दोन तोळे वजनाचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी हिसकावून पळवून नेल्याची घटना मार्केट यार्ड परिसरातील महात्मा फुले चौक येथे शनिवारी (दि.१४) सायंकाळी घडली.

या प्रकरणी वैशाली वसंत मुनोत (वय ५५, रा. तापीदास गल्ली) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैशाली वसंत मुनोत या त्यांची नणंद छाया चंगेडे यांच्यासमवेत आनंदधाम येथे दर्शनासाठी गेल्या होत्या. दर्शनानंतर घरी परतण्यासाठी त्या महात्मा फुले चौकात राऊ हॉटेलजवळ रिक्षाची वाट पाहत उभ्या होत्या. त्याचवेळी सहकार सभागृहाच्या दिशेने दुचाकीवरून आलेल्या दोन व्यक्तींपैकी मागे बसलेल्या व्यक्तीने वैशाली मुनोत यांच्या गळ्यातील २ तोळ्यांचे मंगळसूत्र हिसकावून नेले. त्यांनी आरडाओरडा केला, मात्र चोरटे कोठी रोडच्या दिशेने पसार झाले.

दरम्यान, मंगळसूत्र चोरीच्या घटना पुन्हा वाढल्याचे चित्र आहे. त्यामुळे महिला वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

## नगर शहरातील ५ मटका अड्ड्यांवर पोलिसांचे छापे; ५ जणांवर गुन्हे दाखल

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नगर – लोकांकडून पैसे घेऊन कागदांच्या चिठ्ठ्यावर आकडे देऊन कल्याण मटका जुगार चालवणाऱ्या अड्ड्यांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत पाच जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ६ हजार २४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई शहरातील जुना बाजार, आशा टॉकीज चौक, चाणक्य चौक, टिळक रोड, पिंजार गल्ली येथे केली.

शहरातील जुनाबाजार येथील पत्र्याच्या टपरीच्या आडोशाला सुरू असलेल्या कल्याण मटका अड्ड्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत अय्याज यासीन सय्यद (वय ५६, रा. जुना बाजार, खिस्त गल्ली) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून ९६० रुपये रोख, दोन डुप्लिकेट पासबुक, बॉलपेन असा मुद्देमाल जप्त केला.

दुसऱ्या कारवाईत आशा टॉकीज चौकातील पत्र्याच्या टपरीच्या आडोशाला सुरू असलेल्या मटका अड्ड्यावर छापा टाकून पोलिसांनी सुधीर डॅनियल क्षेत्रीय (वय ५८, रा. पाटील हॉस्पिटल मागे,कोठी) यास ताब्यात घेऊन त्याच्या कडील १ हजार २३० रुपये रोख डुप्लिकेट पुस्तक बॉलपेन अशी कल्याण मटक्याची साधने जप्त केली.

तिसऱ्या कारवाईत बोरगाव रोडवरील चाणक्य चौक येथील पत्र्याच्या टपरीच्या आडोशाला सुरू असलेल्या कल्याण मटका अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत शशिकांत नारायण कोरे (वय ५०, रा. शास्त्रीनगर केडगाव) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडील १ हजार ५८० रुपये रोख रक्कम व मटका जुगारीची साधने असा मुद्देमाल जप्त केला.

चौथ्या कारवाईत टिळक रोड वरील पत्र्याच्या टपरीच्या आडोशाला सुरू असलेल्या मटका अड्ड्यावर छापा टाकून कांतीलाल शरद सितापुरे (वय ४३, रा. सुडके मळा बालिकाश्रम रोड) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून १ हजार ४४० रुपये रोख रक्कम व मटका जुगारीचे साधने असा मुद्देमाल जप्त केला.

पाचव्या कारवाईत पिंजर गल्ली येथील पत्र्याच्या टपरीच्या आडोशाला सुरू असलेल्या कल्याण मटका जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला या कारवाईत राज मोहम्मद गफूर शेख (वय ५५, रा. पिंजार गल्ली, अ.नगर) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडील १ हजार ३० रुपये कल्याण मटका जुगाराची साधने जप्त केली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १९८७ चे कलम १२ (अ) अन्वये पाच वेगवेगळ्या गुन्ह्याची नोंद केली.

ही कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस हवालदार बेरड, पोलीस कॉन्स्टेबल सागर ससाणे रवींद्र घुंगासे, कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल सुजय हिवाळे पोलीस कॉन्स्टेबल दीपक रोकडे यांनी केली.

## नुकसानीची भरपाई मागितल्याने व्यावसायिकाला मारहाण

### भिंगारमधील प्रकार; गुन्हा दाखल

नगर – गाडीच्या नुकसानीची भरपाई मागितल्याचा राग आल्याने तिघांनी भिंगार येथील फर्निचर व्यावसायिकाला मारहाण करत त्याच्यावर चाकूने वार केल्याची घटना शनिवारी (दि.१४) रात्री घडली. या प्रकरणी जखमी शहेबाज पिरमहंमद शेख (वय ५५, रा. मोमीन गल्ली, भिंगार) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेहान आमीन आतार, आमीन दगडू आतार, साकीन दगडू आतार (सर्व रा. मोमीन गल्ली, भिंगार) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिघांनी रेहान याचा भाऊ व आई यांना शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

अधिक तपास पोलीस हवालदार व्ही. आर. गारुडकर करत आहेत.

## रस्त्यात सापडलेले पाकीट पोलिस हवालदाराने तरुणाला केले परत



रस्त्यात सापडलेले पाकीट आदित्य रायकर या तरुणाकडे सुपूर्द करताना पोलिस नियंत्रण कक्षातील पो.हे.कॉ. राजेंद्र नरवडे.

नगर – सकाळच्या वेळी घरातून कर्तव्यावर निघालेल्या पोलिस हवालदाराला रस्त्यात एक पाकीट सापडते, त्यात पैसे तसेच आधारकार्ड, पॅन कार्ड, एटीएम कार्ड व इतर महत्वाचे दस्ताऐवज असतात. ते पाकीट पाहून अन्य कुणी असता तर पाकिटातील पैसे काढून घेत ते तेथेच कुठे तरी फेकून दिले असते. मात्र या प्रामाणिकपणे पोलिस दलात सेवा करणाऱ्या पोलिस हवालदाराने कार्यालयात येताच पाकिटाच्या मालकाचा शोध घ्यायला सुरुवात केली. बराच वेळ शोध घेतल्यानंतर ते पाकीट ज्याचे आहे त्या तरुणाचा शोध लागला आणि त्याला ते सुपूर्द करण्यात आले.

जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयातील नियंत्रण कक्षात कार्यरत पो.हे.कॉ. राजेंद्र नरवडे असे त्यांचे नाव आहे. नरवडे हे गणेश चौक बोल्हेगाव येथे राहतात व नियंत्रण कक्षात कार्यरत आहेत. सोमवारी (दि.१६) सकाळी ८ च्या सुमारास ते दुचाकीवर पोलिस अधिक्षक कार्यालयाकडे येण्यास निघाले. त्यांना रस्त्याच्या कडेला एक पाकीट पडलेले दिसले. त्यांनी ते उचलून पाहिले असता त्यात पैसे व इतर महत्वाचे दस्ताऐवज होते.

त्यांनी कार्यालयात येवून ज्याचे पाकीट आहे त्याचा शोध सुरु केला. बराच वेळ शोध घेतल्यावर दिल्लीगेट परिसरात राहणाऱ्या आदित्य रायकर याच्याशी संपर्क झाला. ते पाकीट त्याचेच होते. त्याला नियंत्रण कक्षात बोलावून डायल ११२ प्रणालीचे पोलिस उपनिरीक्षक अंबादास हुलगे यांच्या सह इतर सहकाऱ्यांच्या उपस्थितीत सदर पाकीट आदित्य रायकर या तरुणाला सुपूर्द करण्यात आले.

## आयकॉन पब्लिक स्कूलचा ‘सर्वोत्कृष्ट सीबीएसई शाळा’ पुरस्काराने सन्मान



नगर – ब्रेन वर्ल्ड ग्रुप आयोजित १९ व्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिषदेत नगरमधील स्टेशन रोडवरील आयकॉन पब्लिक स्कूलला ‘वर्षातील सर्वोत्कृष्ट सीबीएसई शाळा’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी दिली.

स्कूल शिक्षण क्षेत्रात एका उच्च ध्येयाने कार्यरत आहे. सर्वोच्च गुणवत्तेला प्राधान्य देत सर्वोत्कृष्ट आधुनिक शिक्षण देतानाच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर दिला जातो. हा पुरस्कार शाळेचे सर्व समर्पित शिक्षक, सहाय्यक कर्मचारी, प्रेरित विद्यार्थी आणि प्रोत्साहन देणारे पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांचा परिपाक आहे. या सर्वांनी एकत्रितपणे एक प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण तयार केले आहे.

आज शाळेचे विद्यार्थी शिक्षण, क्रीडा, कला, विविध स्पर्धा परीक्षा अशा सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादीत करून शाळेचा नावलौकिक वृध्दींगत करीत आहेत. त्याची दखल घेत ब्रेन वर्ल्डने शाळेला पुरस्काराने गौरविले आहे. हा सन्मान आयकॉन पब्लिक स्कूलला शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम राखण्यासाठी प्रोत्साहित करणारा आहे. या यशाबद्दल संस्थेचे संचालक कर्नल आर.सी.राणा, संचालिका आराधना राणा यांच्यासह सर्व संस्था पदाधिकारी, सदस्यांनी शिक्षक, विद्यार्थी, पालकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## भिंगार हायस्कूलचा विज्ञान परीक्षेत १००% टक्के निकाल





नगर – अहमदनगर जिल्हा विज्ञान अध्यापक संघामार्फत इ.६ वी व इ.९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या विज्ञान परीक्षेत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भिंगार हायस्कूल चा निकाल १००% लागला असून नाटक राजू ६ वी, काळे श्रेया ९ वी हे विद्यार्थी केंद्रात प्रथम आले असून त्यांची जिल्हा विज्ञान गुणवंत विद्यार्थी निवड परीक्षेसाठी निवड झाली आहे.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छाया फिरोदिया, संस्थेचे व विद्यालयाचे सर्व पदाधिकारी, शाला समिती चेअरमन नंदकुमार झंवर व सर्व सदस्यांनी अभिनंदन केले आहे. या विद्यार्थ्यांना काळे वर्षा व शिंदे दिगंबर यांचे मार्गदर्शन लाभले.

## स्वस्तिक नेत्रालयात १८ डिसेंबरपासून मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

नगर – शहरातील स्वस्तिक नेत्रालयातील डॉ. प्रफुल्ल चौधरी यांना भारतातील सर्वात मोठ्या आणि प्रतिष्ठित नेत्ररोग तज्ज्ञांच्या संघटनांपैकी एक असलेल्या बॉम्बे ऑप्थॉल्मिक असोसिएशन येथे लाईव्ह सर्जरी करण्याचा सन्मान मिळाला. हा एक महत्त्वाचा आणि अभिमानास्पद क्षण असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नेत्ररोग उपचारांमध्ये उत्कृष्टता सादर करण्यासाठी मिळालेली संधी असल्याचे डॉ. चौधरी यांनी सांगितले. या सर्जरी दरम्यान डॉ. प्रफुल्ल चौधरी यांनी टॅरिक ॲडव्हान्स मोनोफोकल लेन्सेसचा उपयोग करुन कॉर्नियल ॲस्टिग्मॅटिझम सुधारण्याची प्रक्रिया यशस्वीरित्या सादर केली. तसेच अप्पासामी गॅलेक्सी लिओ फेको सिस्टम आणि टू ग्लो मायक्रोस्कोप यांसारख्या अत्याधुनिक भारतीय तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णांना उत्कृष्ट, मध्यम आणि लांब अंतराच्या दृष्टीसाठी उपचार प्रदान करण्यात आले. या यशात पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, डॉ. रघिनी पारेख, डॉ. करिश्मा वाडिया, डॉ. सुमीत लहाने आणि रघुनाथ नेत्रालय टीम यांचे योगदान असल्याचे डॉ. चौधरी यांनी सांगितले.

या निमित्ताने चष्म्याचा नंबर कमी करणारी अत्याधुनिक पद्धतीने मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर १८ ते २१ डिसेंबर दरम्यान सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत स्वस्तिक नेत्रालयामध्ये आयोजित करण्यात आली आहे. शिबीराचा रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. कल्याणी चौधरी यांनी केले. शिबीरासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे. संपर्क क्र.९२४४१०८१०८.

## जास्त नफ्याच्या आमिषाने एकाची साडेदहा लाख रुपयांची फसवणूक

### सायबर पोलिस ठाण्यात २ टेलिग्राम आय डी धारकांवर गुन्हा दाखल

नगर – टेलिग्रामद्वारे गुंतवणुकीवर जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एकाचे साडेदहा लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. ९ ते ११ डिसेंबर दरम्यान ही घटना घडली. या प्रकरणी प्रकाश कुमार घुरण कश्यप (हल्ली रा. कुकाणा, नेवासा, मूळ रा. मधुबनी, बिहार) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

९ ते ११ डिसेंबर दरम्यान प्रकाश कुमार यांना ऐश्वर्या व क्रिस्ता या दोन टेलिग्राम आयडी धारकांकडून गुंतवणुकीवर जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून आर्थिक व्यवहार करण्यास भाग पाडले. त्यांच्याकडून साडेदहा लाख रुपये घेऊन ते परत न करता, त्यांची फसवणूक केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर प्रकाश कुमार यांनी नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात येवून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक संतोष खेडकर हे करत आहेत.

दरम्यान, ऑनलाईन गुंतवणूक करून फसवणूक होण्याच्या घटना वारंवार घडत असतानाही नागरिकांकडून कोणतीही खातरजमा न करता आमिषाला बळी पडून लाखो रुपयांची गुंतवणूक केली जात आहे. नागरिकांनी खात्री केल्याशिवाय अशाप्रकारे गुंतवणूक करू नये, आर्थिक व्यवहार करताना दक्षता घ्यावी, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



भक्तिमय वातावरणात तपोवन हडको येथे दत्त जयंती साजरी करण्यात आली.

## भक्तिमय वातावरणात तपोवन हडको येथे दत्त जयंती साजरी

नगर – तपोवन रोड ढवन वस्ती येथील तपोवन हडको मित्र मंडळ अष्टविनायक मित्र मंडळ व महिला मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली व परिसरातील नागरिकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नगरसेविका शारदाताई ढवण व अनिल ढवन यांचे मार्गदर्शन सहकार्य लाभले. दत्त जयंती निमित्त संध्याकाळी भक्तिमय वातावरणात पाळणा हलवून महाआरती करण्यात आली व महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी नगरसेविका दिपालीताई बारस्कर, बाळासाहेब बारस्कर, शारदाताई ढवण, अनिल ढवन, मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब खकाळ, उपाध्यक्ष तुकाराम बोरुडे, खजिनदार सौरभ म्हस्के, श्याम माने, मुकेश आंबेकर, गणेश चव्हाण, चंदू टाके, अमित शेख, हिरामण पोपेरे, सुरज जगधने, अभिषेक गवळी, गणेश बोरुडे, ऋतिक गवळी, रोहित जगधने, निखिल नलगे, परशुराम दरेकर, प्रकाश भोंदवे, अजिंक्य पवार, समीर शेख, समीक्ष गांधी, दिशान शेख, अनिकेत खुर्जेकर, भागेश शिंदे, कृषी टाके, कुणाल मदने, करण मदने, गुरुनाथ क्षेत्रे, शिवा सुरवसे, शुभम नाटक, सचिन ताटे, अशोक म्हस्के, शशिकांत पाटोळे, लक्ष्मण सदाफुळे आदीसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## रिक्षा चालकाकडून तरूणीचा विनयभंग; गुन्हा दाखल

नगर – रिक्षातून प्रवास करणाऱ्या एका तरुणीची रिक्षा चालकाने छेडछाड केली. तिचा हात पकडून तिच्याकडे मोबाईल नंबरची मागणी करत गैरवर्तन करुन तिचा विनयभंग केल्याची घटना छत्रपती संभाजीनगर मार्गावरील पोखर्डी फाट्याजवळ शनिवारी (दि.१४) सायंकाळी घडली.

पीडित युवती रिक्षातून प्रवास करत असताना रिक्षा चालकाने पोखर्डी फाट्याजवळ तिचा हात धरुन मोबाईल नंबरची मागणी केली. तिच्याशी गैरवर्तन केले. या प्रकरणी पीडित तरुणीच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात रिक्षा चालक नवाज शेख याच्या विरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास उपनिरीक्षक मोंढे करत आहेत.




### छगनराव भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने सकल ओबीसी समाजाच्यावतीने निदर्शने

ओबीसींचे जेष्ठ नेते छगनराव भुजबळ यांना महायुती सरकारने मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने आहिल्यानगर येथे सकल ओबीसी समाजाच्या वतीने माळीवाडा येथील महात्मा फुले यांच्या पुतळाजवळ निदर्शने करण्यात आली. यावेळी समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, अनिल निकम, नितीन भुतारे, बाळासाहेब भुजबळ, भरत गारुडकर, बापूसाहेब शिंदे, सुनील लोंढे, जवाहर भुजबळ आदी.

